www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २१ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार २५ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात




### डोंबिवलीतील स्फोटप्रकरणी मालती मेहता नाशिकमध्ये अटकेत

● नाशिक, सचिन कदम :

डोंबिवली एमआयडीसीमध्ये झालेल्या स्फोटप्रकरणी मुख्य आरोपी मालती मेहता यांना नाशिकपोलिसांनी शहरातील मेहेरधाम परिसरातील पेठ रोड येथून ताब्यात घेतले आहे. सूनेच्या भावाकडे त्या अटक टाळण्यासाठी लपून बसल्या होत्या.

मालती मेहता या अमुदान कंपनीच्या मालक असून बॉयलर स्फोटप्रकरणी त्यांच्यासह मलय मेहतांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डोंबिवलीतील रिॲक्टर स्फोटात ११ जण मृत झाले होते. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. डोंबिवली येथील एमआयडीसीतील अमुदान स्फोटातील मुख्य आरोपी मालती मेहता या नाशिकला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुरूवारी रात्रीपासून नाशिक क्राईम ब्रांच युनिट १ आणि आणि ठाणे क्राईम ब्रांच पोलिसांनी संयुक्त पद्धतीने कारवाई करत त्यांना अटक केली आहे. डोंबिवलीमध्ये स्फोट झाल्यानंतर अमुदान कंपनीचे मालक फरार झाले होते. त्यांच्या मोबाईलचे लोकेशन पोलिसांनी तपासले. ते नाशिक येथे असल्याची पक्की खबर मिळाली. त्यानुसार ठाणे पोलिसांचे पथक नाशिक पोलिसांच्या संपर्कात होते.

पान २ वर

## सिडकोच्या ऑनलाईन लिलावामध्ये घोटाळ्याची साशंकता !

● पनवेल, विशाल पाटील :





सिडको महामंडळाने नूकतीच बामनडोंगरी येथील दूकानांसाठी ऑनलाईन बोलीपद्धतीने लिलाव आयोजित केला होता. मात्र लिलाव अंतिम टप्यात असताना सिडकोचे संकेतस्थळावर काहीच हालचाली होत नसल्याने गुंतवणूकदारांनी संताप व्यक्त करत लिलावात काही काळंबेरं असल्याचा आरोप केला आहे. याबाबत सिडको मंडळाने स्पष्टीकरण देऊन काही काळांसाठी तांत्रिक अडचणी असल्याने ही अडचण झाल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. यानंतर गुंतवणूकदारांनी बामनडोंगरी येथील दूकानांचा लिलावाचा कार्यक्रम पुन्हा आयोजित करावा अशी मागणी समाजमाध्यमांवर केली आहे. सिडको मंडळातील महागृहनिर्माणाची आणि दूकानांची सोडत ऑनलाईन पद्धतीने होते. दक्षिण नवी मुंबईत विक्रीसाठी अजूनही सिडको महामंडळाला वाव असल्याने या परिसरातील घर, भूखंड आणि दूकाने यांच्या लिलावातून मिळणा-या उत्पन्नामुळे सिडकोच्या तिजोरीत भरभराट आहे.

पान २ वर

# महाराष्ट्रात पाणीटंचाईचं भीषण संकट !

## धरणांनी गाठला तळ, तब्बल 3500 टँकरने पाणीपुरवठा

● मुंबई, यश सावंत :







मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दिवसेंदिवस परिस्थीती भीषण होत चाललीय.. राज्यातील वाड्यावस्त्यांमध्ये जवळपास 3 हजार 692 टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. राज्यात पाणीबाणी निर्माण झाली आहे. राज्यातील जवळपास सर्वच जिल्हयाचा पाणीपुरवठा टँकर भरोसे झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

मराठवाड्यात 1256 गावं आणि 506 वाड्यांना 1849 टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. पश्चिम महाराष्ट्र 631 गावं आणि 3829 वाड्यांना 755 टँकरने पाणीपुरवठा होत आहे. उत्तर महाराष्ट्रात 756 गावं आणि 2570 वाड्यांना 812 टँकरनं पाणीपुरवठा केला जातोय. कोकण विभागात देखील हेच चित्र आहे. 232 गावं आणि 766 वाड्यांना 177 टँकरनं पाणीपुरवठा केला जात आहे. अमरावती विभागात 87 गावांना 92 टँकरनं तर, नागपूर विभागात 11 गावांना 7 टँकरनं पाणीपुरवठा केला जात आहे.

राज्यात दुष्काळसदृष्य परिस्थिती गंभीर झालीय. त्यामुळे तात्काळ मदत आणि उपाययोजनांसाठी आचारसंहिता शिथील करा अशी विनंती राज्य सरकारने राज्य निवडणूक आयोगाला केली आहे. महाराष्ट्रातील शेवटच्या 5 व्या टप्पाचं मतदान संपून तीन दिवस झालेत. लोकसभा निवडणुक आचारसंहिता शिथील झाल्यास राज्य सरकारच्या दुष्काळी उपाययोजनांना गती मिळणार आहे. राज्यातील जनतेला हंडाभर पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावं लागतंय.. वर्षानुवर्षाची हीच स्थिती आहे.. यावर कायमस्वरुपी तोडगा कधी निघणार हाच खरा प्रश्न आहे.

## मुंबईतही हिट अँड रन, अल्पवयीन मुलाच्या दुचाकीनं धडक दिल्यामुळे एकाचा मृत्यू

● मुंबई, विशाल कारंडे :



पुण्यातील कल्याणी नगर परिसरात पोर्शे कार चालवत असलेल्या 17 वर्षीय अल्पवयीन मुलाने एका दुचाकीला धडक दिली होती. या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. एकीकडे पुण्यातील हिट अँड रन प्रकरण चर्चेत असताना मुंबईतही अशाच प्रकारचा एक भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईत एका 15 वर्षीय अल्पवयीन मुलाने 32 वर्षीय तरुणाला व्यक्तीला धडक दिली आहे. या अपघातात 32 वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबईतील माझगाव परिसरात गुरुवारी (23 मे) एक भीषण अपघात घडला. यात एका 15 वर्षीय अल्पवयीन मुलाने दुचाकीनं एका 32 वर्षीय तरुणाला धडक दिली आहे. या दुचाकीच्या धडकेत 32 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी सातच्या सुमारास हा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एक 15 वर्षांचा मुलगा माझगाव डॉक सर्कल येथून नेसबीट ब्रीज मार्गे जे जे रोडच्या दिशेने येत असताना त्याच्या विरुद्ध दिशेने येणाऱ्या दोन बाईकची धडक झाली. या घटनेत इरफान नवाब अली शेख (32) नावाचा व्यक्ती गंभीर जखमी झाला. या अपघातानंतर त्या व्यक्तीला तात्काळ भायखळा येथील जे जे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं.

पान २ वर

## मोठ्या आवाजात भांडणाऱ्याकडे पाहिल्याने कामोठ्यात डॉक्टराला मारहाण

● पनवेल, भावना जैन :



एक तरुण रात्रीच्या साडेबारा वाजता दोन मुलींसोबत भांडत होता. तो तरुण मोठ्या आवाजात का भांडतोय, हे तिथे रिक्षाची वाट पाहत उभ्या असलेल्या एका ६९ वर्षीय डॉक्टरांनी पाहीले. एवढेच निमित्त झाल्याने या २० वर्षीय तरुणाने लाथाबुक्यांनी मारहाण केली. या मारहाणीत डॉक्टरांच्या डाव्या हाताच्या मनगटाला फॅक्चर झाले. हा सर्व प्रकार कामोठे वसाहतीमधील सेक्टर ७ येथे बुधवारी मध्यरात्री घडला. सामान्य व्यक्ती सहसा रस्त्याकडेला उभे असले तरी कोणाच्या मदतीसाठी पुढे सरसावत नाहीत. दूसऱ्या व्यक्तीच्या अडचणी सोडविताना स्वताची अडचण वाढू नये असा त्यामागील भाव असतो. मात्र करंजाडे येथे राहणारे ६९ वर्षीय नंदलाल रायदास हे बुधवारी रात्री साडेबारा वाजता कामोठे वसाहतीमधील सेक्टर ७ येथील साईप्रसाद आर्केड या इमारतीजवळ रिक्षाची वाट पाहत उभे होते. या दरम्यान कामोठे वसाहतीमधील सेक्टर २२ येथील तुलसी हाईट्स या इमारतीमध्ये राहणारा २० वर्षांचा शंभुराज भोसले हा दोन मुलीसोंबत तिथे भांडण करत होता. डॉ. नंदलाल यांनी शुंभराज याच्याकडे मोठ्या आवाजाने का भांडण करीत आहेस एवढीच विचारणा केली याचा राग शंभुराज याला आल्याने त्याने डॉ. नंदलाल यांना लाथाबुक्याने मारहाण केली. जखमी अवस्थेत ६९ वर्षीय डॉ. नंदलाल हे रुग्णालयात जाऊन त्यांनी उपचार घेतले. पहाटे पाच वाजता त्यांनी शंभुराज याच्याविरोधात गुन्हा नोंद केला. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात मारहाणीबाबत गुन्हा नोंद केला असून हा गुन्हा सात वर्षांच्या पेक्षा कमी शिक्षेचा असल्याने संशयीत आरोपी शंभुराज भोसले याला कलम ४१ (अ)(१) फौजदारी प्रक्रीया संहिते अन्वये नोटीस देऊन सोडण्यात आले आहे.

## निकालानंतर चिअर्स.. हायकोर्टाकडून बार मालकांना दिलासा, 4 जून रोजी दारू विक्रीला परवानगी




● मुंबई, दिगंबर जाधव :

लोकसभा निवडणुकांच्या (Election) निकालाची सर्वांनाच उत्सुकता लागली असून 4 जून रोजी जल्लोष करण्यासाठी सर्वच कार्यकर्ते सज्ज झाले आहेत. मात्र, कोणाला खुशी तर कोणाला नाराजीचा सामान करावा लागणार आहे. त्यामुळे, कही खुशी, कही गम.. असे वातावरण 4 जून रोजी देशभरात पाहायला मिळणार आहे. त्याच, अनुषंगाने मुंबईत (Mumbai) 4 जून रोजी दारुविक्री बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले होते. मात्र, या निर्णयाविरोधात दाखल याचिकेवर आज न्यायालयात (Court) निर्णय झाला. त्यामुळे, हायकोर्टातन तळीरामांसाठी गुडन्यूजच आली असल्याचे म्हणता येईल.

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सर्वच मतदारसंघात मतदानच्या दिवशी दारुबंदीचे आदेश दिले होते. त्यामुळे, मतदान होईपर्यंत मतदारसंघातील दारुची दुकाने, बार बंद ठेवण्यात आले. शेवटच्या टप्प्यात मुंबईतील 6 लोकसभा मतदारसंघात मतदान झाले.

पान २ वर

# राज्यात दुष्काळाची स्थिती गंभीर

## शरद पवारांनी राज्य सरकारकडे केल्या मागण्या..

● पुणे, अभिजित येरल्लू :



राज्यात मागील वर्षी कमी पाऊस झाल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न भेडसावत आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर इथं पत्रकार परिषद घेत शेतकऱ्यांच्या वतीने सरकारकडे अनेक महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या आहेत. राज्यातील दुष्काळाच्या स्थितीची माहिती देताना शरद पवार म्हणाले की, "महाराष्ट्रात सध्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. आपल्याकडे देशात सर्वाधिक धरणं आहेत. मात्र संभाजीनगर येथील धरणात १० टक्के पाणी आहे, पुणे विभागातील धरणांमध्ये १६ टक्के पाणी आहे, नाशिक विभागातील धरणांमध्ये २२ टक्के आणि कोकणातील धरणांमध्ये २९ टक्के पाणी आहे. महाराष्ट्रात जी मोठी धरणं आहेत, त्यामध्ये उजणी धरणात सध्या उपयुक्त जलसाठा शून्य टक्के आहे, मराठवाड्यातील जायकवाडी धरणात ५.५० इतका जलसाठा आणि मांजरा धरणात ०.३४ टक्के आणि धाराशिव जिल्ह्यातील धरणांमध्येही शून्य टक्के पाणीसाठी आहे. नगर जिल्ह्यातील तिन्ही मोठ्या धरणांमध्ये ९ टक्के पाणीसाठी आहे," असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

पवारांनी सरकारकडे केलेल्या मागण्या..

१. आता आपण मे महिन्याच्या अखेरीस आहोत आणि साधारण जुलै एंडपर्यंत पाण्याची स्थिती अशीच राहण्याची शक्यता आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या ठिकठिकाणी निर्माण झाली आहे. संभाजीनगर विभागात १५६१ गावांमध्ये पाण्याची मागणी आहे आणि या विभागात १८३७ इतके टँकर सध्या आहेत. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांकडे वेळीच लक्ष दिलं नाही तर तेथील परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिथं आवश्यकता आहेत तिथे टँकर सुरू करावेत.


२. शेतकऱ्यांनी विमा काढलेला आहे, मात्र विमा कंपन्या हे पैसे देण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे राज्य सरकारने केंद्र सरकारशी बोलून या विमा कंपन्यांना योग्य त्या सूचना देण्याची गरज आहे.

३. वीज बिलात सूट द्यावी. वीज बील वसुलीला स्थगिती द्यावी आणि कोणत्याही स्थितीत बिल भरले नाही म्हणून शेतकऱ्यांची वीज खंडित करू नये.

पान २ वर

## लोकसभेच्या धामधुमीत झालेल्या शेतकरी आत्महत्या दुर्लक्षित; आत्मघाताची दुर्देवी मालिका कायम !

● नागपूर, नितीन देवळेकर :



शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा अशी ओळख असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात यंदाच्या वर्षातही आत्मघाताची मालिका कायम आहे. सर्व नेते मंडळी व प्रशासन 'लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव' साजरा करण्यात व्यस्त असल्याने लोकसभेच्या धामधुमीत झालेल्या आत्महत्या जास्तच दुर्लक्षित ठरल्या आहे.

तब्बल साडेसात लाख हेक्टर खरीप खालील क्षेत्र, सव्वा लाखाच्या आसपास रब्बी पिकाखालील क्षेत्र,१० लाख ८५ हजार इतकी पशुधन संख्या, साडेपाच लाखांच्या आसपास शेतकरी संख्या, जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत सिंहाचा वाटा यामुळे कृषिप्रधान जिल्हा अशी बुलढाण्याची ओळख आहे. दुसरीकडे शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा अशी कलंक असलेली ओळखही बुलढाणा आपल्या माथी मिरवत आहे. मागील दोन दशकांपासून हा डाग कायम आहे.

सन २००१ मध्ये शेतकरी आत्महत्येची पहिली नोंद झाली.२००१ ते २००५ पर्यंत आत्महत्यांचा हा आकडा दुहेरी राहिल्याने त्यांना गांभीर्याने घेण्यात आले नाही .मात्र २००६ मध्ये हा आकडा थेट ३०६ वर गेल्यावर शासन अन प्रशासन खडबडून जागी झाले. २०१७ मध्ये ३१२, २०१८ मध्ये ३१८ तर सन २०२२ मध्ये सर्वाधिक म्हणजे ३२१ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली. मागील वर्षी यात घसरण होऊन हा आकडा २३७ वर आला हाच काय तो दिलासा ठरला.

पान २ वर

## निवडणूक आयोगाला दिलासा!

### मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

● नवीदिल्ली, प्रगती शर्मा :



लोकसभा निवडणुकीदरम्यान मतदान केंद्रावर झालेल्या मतदानाची आकडेवारी ( फॉर्म १७ क ) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यासंदर्भात निवडणूक आयोगाला निर्देश द्यावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. निवडणूक प्रक्रिया सुरु असताना मनुष्यबळाअभावी निवडणूक आयोगाला असे करणे शक्य नाही. त्यामुळे सद्यस्थितीत असे निर्देश देता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' आणि 'कॉमन कॉज' या स्वयंसेवी संस्थांनी यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर आज न्यायमूर्ती दिपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली.

पान २ वर

## संपादकीय

# उच्चपदस्थांची कानउघडणी !

सामान्य नागरिक, लहानसा सरकारी अधिकारी वा कनिष्ठ पोलीस यांच्यापेक्षा सर्वोच्च न्यायालय जेव्हा घटनात्मक यंत्रणांना फटकारते तेव्हा त्याचे महत्त्व आणि समाधानही, काही वेगळेच असते. सद्यःस्थितीत हे समाधान निवडणूक आयोग आणि राज्यपाल या दोन यंत्रणा मुबलकपणे नागरिकांस देताना दिसतात. त्याचे श्रेय भाजपचे. वास्तविक शिस्तबद्ध कार्यकर्त्यांची अखंड पैदास असलेला पक्ष आणि पुढच्या पिढीची वा शंभर वर्षांनंतरच्या भारताची चिंता वाहणारे विचारकुल असतानाही भाजप राज्यपालपदासारख्या महत्त्वाच्या स्थानी हे असले एकापेक्षा एक गणंग का नेमतो हा प्रश्नच. शिवाय घरात एकापेक्षा एक नमुने असताना परत निवृत्त न्यायाधीश अभिजित गंगोपाध्याय यांच्यासारख्या गणंगोत्तमांची गरज त्यास का लागते हे कोडेही आहेच. असो. तूर्त सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि राज्यपाल यांवर ओढलेल्या कोरड्यांबाबत. गेल्या आठवड्यात दोन स्वतंत्र प्रकरणांत या दोन यंत्रणांना सर्वोच्च न्यायालयाने त्यांची जागा दाखवून दिली.

यातील पहिला मुद्दा आहे तो सध्या सुरू असलेल्या निवडणुकांत मतदान संपल्यानंतर मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यास प्रदीर्घ काळ घेणाऱ्या निवडणूक आयोगाबाबत. हा प्रकार विशेषतः मतदानाच्या पहिल्या फेरीत दिसून आला. मतदान नियमाप्रमाणे सायंकाळी सहा वाजता संपते. त्यावेळी जी आकडेवारी समोर येते ती अर्थातच जुजबी असते कारण मतदान संपण्याच्या मुदतीआधी, म्हणजे सहा वाजायच्या आत, मतदान केंद्रांवर रांगेत हजर असणाऱ्यास प्रत्यक्षात सहानंतरही मत नोंदवता येते. त्यामुळे काही मतदान केंद्रांवर रात्री दहा वाजेपर्यंतही मतदान होते. ही आकडेवारी जमा करण्यात वेळ जातो. पण आतापर्यंत दुसऱ्या दिवशी दुपारी बारा वाजेपर्यंत कोणत्याही मतदारसंघांतील सर्व केंद्रांवरून सर्व आकडेवारी जमा होत असे आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत प्रत्यक्षात मतदान किती झाले याची सविस्तर आकडेवारी निवडणूक आयोग प्रसृत करू शकत असे. पण या वेळी निवडणूक आयोग प्रत्यक्ष मतदानाचा तपशील नोंदवण्यात दहा-दहा दिवस घेताना दिसतो. हे कसे, हा यामागील प्रश्न. 'लोकसत्ता'ने रविवारच्या अंकात मतदानाची प्रक्रिया सविस्तरपणे विशद केली होती. तिचा संदर्भ येथे देणे सयुक्तिक ठरेल. लोकशाही हक्कांसाठी लढणाऱ्या संस्थेने (एडीआर) सर्वोच्च न्यायालयासमोर हाच मुद्दा मांडला.

याआधी याच संस्थेने मतदान पुन्हा एकदा मतपत्रिकांद्वारे व्हावे अशी मागणी केली होती. ती सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली; ते योग्यच. त्यामुळे मतदानाचा सर्व तपशील आयोगाने तातडीने जाहीर करावा ही या संस्थेची मागणीही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळावी अशी निवडणूक आयोग आणि सरकार यांची इच्छा होती.

दुसरी घटना आहे ती पश्चिम बंगालचे राज्यपाल आनंद बोस यांच्याबाबत. वास्तविक राजभवनातून या महामहिमांस तातडीने नारळ देण्याची गरज असताना अत्यंत नैतिकवादी केंद्र सरकार त्यांना संरक्षण देताना दिसते. या महामहिमांविरोधात राजभवनातील एका महिला कर्मचाऱ्याने गैरवर्तनाचा आरोप केला असून त्यामुळे घाबरून या महोदयांनी राज्य पोलिसांवरच निर्बंध आणले. त्या राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी चक्रमपणाबाबत स्पर्धा करणे कठीण हे लक्षात आल्याने या महामहिमांस त्यांच्या हाताखालील पोलीस काय करतील आणि काय नाही, असे वाटले असणार. पण मुद्दा हा नाही. राज्यपाल हे त्या-त्या राज्यांतील विद्यापीठांचे कुलपती असतात. त्यातून या महामहिमांचे मुख्यमंत्री बॅनर्जी यांच्याशी विविध विद्यापीठांचे कुलगुरू नेमण्याबाबत वाद निर्माण झाले. राज्य सरकारने प्रस्तावावे आणि महामहिमांनी आडवे यावे हा खेळ सध्या अनेक भाजपेतर राज्यांत खेळला जाताना दिसतो. राजभवनातील महामहिमांची प्यादी केंद्र सरकार सर्रास विरोधी पक्षीयांच्या राज्यात वापरत असते. स्वतःचे असे प्यादेकरण करू देण्यात हे बोसबाबू आघाडीवर. हे बोसबाबू काय, तमिळनाडूचे आर. एन. रवी काय किंवा महाराष्ट्राचे माजी महामहीम भगतसिंह कोश्यारी काय..! सगळे एकाच माळेचे मणी. अर्थात प्यादेकरण मंजूर नसते तर या मंडळींस राजभवनी वास्तव्याचा लाभ मिळताच ना! तो लाभ घेत असताना या बोसबाबूंनी ममतादीदींच्या नेमणुकांस आव्हान तर दिलेच; पण स्वतःच्या अखत्यारीत काही कुलगुरूंच्या नियुक्त्या केल्या. यांस अर्थातच ममतादीदींनी न्यायालयात आव्हान दिले.



### आजची चित्रोळी

पाचोळयाच्या आड जीवन फुललें
वृद्धत्वास्तव बाल्य उमलूनी आलें
आधार नव्याला जुनें देऊनी जाते
माय कुशीला खरेंच जीवन फुलतें

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### डोंबिवलीतील स्फोटप्रकरणी मालती...

डोंबिवलीतील कंपनीत स्फोट झाल्यानंतर मुख्य आरोपी मालती मेहता या नाशिकमध्ये पोहोचल्या होत्या. त्यांनी त्यांच्या नातेवाईकाच्या घरी आश्रय घेतला होता. त्यांच्या अटकेची माहिती पंचवटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांनी दिली. वैद्यकीय तपासणी करून मालती मेहता यांना ठाणे पोलिसांकडे सोपविण्यात आले.

### सिडकोच्या ऑनलाईन ...

सिडको मंडळाने यापूर्वीही भूखंड लिलाव आणि महागृहनिर्माणातील घर व दूकानांच्या सोडतीची प्रक्रिया पारदर्शक असल्याचा दावा केला आहे. नूकत्याच घडलेल्या बामणडोंगरी येथील दूकानांच्या लिलावामध्ये सहभागी झालेल्या गुंतवणूकदारांनी सिडकोच्या कार्यप्रणालीविषयी साशंकता व्यक्त करत बोली लावताना ऐनवेळेला बंद पडलेल्या ऑनलाईनपद्धतीमुळे लिलावात सामिल होता आले नसल्याचा आरोप करत ही प्रक्रिया राबविणा-या कंपनीला काळया यादीत टाकावे अशी मागणी समाजमाध्यमांवरुन केली आहे. तसेच हा लिलाव पुन्हा आयोजित करावा असेही अनेक गुंतवणूकदारांनी मागणी केली आहे. याबाबत सिडको महामंडळाच्या जनंसपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांनी काही काळासाठी तांत्रिक अडचण झाली होती असे स्पष्टीकरण देताना या घटनेनंतर सिडको मंडळ लवकरच ही अडचण का निर्माण झाली याची तपासणी करणार असल्याचे रातांबे यांनी स्पष्ट केले आहे.

### मुंबईतही हिट अँड रन, अल्पवयीन ...

पण उपचारादरम्यान त्या व्यक्तीचा मृत्यू झाला.

वडील पोलिसांच्या ताब्यात

याप्रकरणी मुंबईतील जे. जे मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मुंबईतील रस्ते अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी याप्रकरणी कारवाई केली आहे. जे जे मार्ग पोलिसांनी अल्पवयीन मुलासह त्याचे वडील जावेद शफीक अहमद शेख यांना ताब्यात घेतलं आहे. या घटनेनंतर जे जे मार्ग पोलिसांनी आयपीसीच्या कलम 304(2) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम 3, 4 अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

### निकालानंतर चिअर्स.. हायकोर्टाकडून बार...

त्यामुळे, येथील वाईन शॉप, दारु दुकाने, पब यादिवशी बंद ठेवण्यात आले होते. आता, 4 जून रोजी मतमोजणी होत असून त्यादिवशीही दारु दुकाने, वाईन शॉप व पब बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांच्याकडून देण्यात आले आहेत. याप्रकरणी, दुकानमालकांनी न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर न्यायालयाने दुकानदारांच्या बाजुने निर्णय दिला.

लोकसभा निवडणूक निकाल जाहीर होताच मुंबईतील दारू विक्री खुली करण्यास मुंबईत उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. आहार संघटनेच्या याचिकेवर हायकोर्टाचे आज निर्णय देताना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. या अगोदर मतमोजणीच्या दिवशी पूर्ण दिवस 'ड्राय डे' जाहीर करण्यात आला होता. मात्र, या याचिकेच्या माध्यमातून बारमालक व दारुविक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाला विरोध केला. त्याच अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने 22 मे रोजी ही याचिका दाखल करुन घेतली. त्यावर, आज न्यायालयात अंतिम सुनावणी झाली असून 4 जून च्या निकाला दिवशी निकाल जाहीर झाल्यानंतर दारुविक्रीला परवानगी देण्यात आली आहे.

### राज्यात दुष्काळाची स्थिती गंभीर

४. मनरेगाच्या कामात जे निकष आहेत ते शिथिल करावेत आणि जसं पूर्वी रोजगार हमी योजनेचे जे निकष राज्य सरकारने आणले होते त्याची अंमलबजावणी करावी.

५. जिथं जास्त दुष्काळ आहे, पिकं गेली आहेत, त्या भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करावे.

६. फळबागांचं नुकसान झाल्यानंतर अनुदान देण्याची पद्धत होती. ते अनुदान राज्य सरकारने आता देण्याची गरज आहे.

७. ज्या ठिकाणी पाणीप्रश्न गंभीर आहे, तिथं जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात.

### लोकसभेच्या धामधुमीत झालेल्या शेतकरी...

यंदाच्या वर्षात ८० आत्महत्या

चालू वर्षातही ही मालिका कायम असून प्रशासकीय भाषेत सांगायचे झाल्यास ८० प्रकरणाची नोंद झाली आहे. जानेवारी २०२४मध्ये १७,फेब्रुवारी १९ मार्च २४, एप्रिल १७ तर मे मध्यावर ३ शेतकऱ्यांनी गळफास लावून वा विष प्राशन करून जीवनाच्या फेऱ्यातून आपली सुटका करून घेतली. लोकसभेची अधिसूचना जारी झालेल्या मार्च , प्रचाराची रणधुमाळी रंगलेल्या एप्रिल महिन्यात मिळून ४७ बळीराजांनी आत्मघाताचा अंतिम पर्याय निवडला.

दरम्यान जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात व प्रशासनात लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव असलेल्या लोकसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले होते. नेते, इच्छुक उमेदवार, राजकीय पक्ष, अगदी शेतकरी संघटनाही लोकसभेत व्यस्त राहिल्या. निवडणूक आचारसंहितेचे मोठे कारण होतेच! यामुळे या आत्महत्या जास्तच दुर्लक्षित ठरल्या. त्यामुळे पात्र , अपात्र आणि प्रत्यक्ष मिळणारी मदत हे आत्महत्त्या नंतरची कार्यवाही अजून बाकी आहे.

### निवडणूक आयोगाला दिलासा!

यावेळी न्यायालयाने सद्यस्थितीत असे निर्देश निवडणूक आयोगाला देता येणार नाही, असं स्पष्ट केले. तसेच न्यायालयीन सुट्टीचा काळ संपल्यानंतर ही याचिका योग्य खंडपीठाकडे सुचीबद्ध केल्या जाईल, असेही न्यायालयाने नमूद केले.

दरम्यान, गेल्या शुक्रवारीसुद्धा या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली होती. यावेळी न्यायालयाने सात दिवसांत उत्तर देण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. या प्रतिज्ञापत्रात, जर फॉर्म १७ क ची प्रत प्रसिद्ध केली, तर त्यामुळे गोंधळ उडू शकतो. तसेच संकेतस्थळावर प्रत प्रसिद्ध केल्यास त्याबरोबर छेडछाड करून त्याचा गैरवापर केला जाऊ शकतो. परिणामता सर्वसामान्य जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास उडू शकतो, अशी भीती निवडणूक आयोगाने व्यक्त केली होती

# प्रवरा नदीपात्रात बचाव कार्य करताना बचाव दलाच्या तीन जणांना वीर मरण

मुंबई : अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात सुगाव बु. येथे प्रवरा नदीपात्रामध्ये दोन मुले बुडाली असल्यामुळे महसूल व वनविभाग मंत्रालय यांचे आदेशान्वये घटना स्थळावर शोध व बचाव कार्य करण्यासाठी राज्य राखीव पोलीस बलाचे अंतर्गत असलेले राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे येथील एक बचाव तुकडी दि.२२.०५.२०२४ रोजी १९.४४ वाजता रवाना करण्यात आली होती.

ही तुकडी घटनास्थळी पोहचून दिनांक २३.०५.२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजता अतिशय शौर्याने शोध व बचाव



कार्य करतेवेळी नदी पात्रामधील पाण्याचा विसर्ग वाढल्यामुळे पाण्याचा तीव्रवेग व पाणी उसळी खात असल्यामुळे बोट पाण्याच्या भोवऱ्यात उलटून दुर्दैवी घटना घडली. त्यात १ पोलीस अधिकारी व ४ पोलीस अंमलदार हे पाण्याच्या प्रवाहात अडकले, त्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक प्रकाश नाना शिंदे, सपोशि/०३ वैभव सुनिल वाघ आणि पोशि/ २८६ राहुल गोपिचंद पावरा यांना वीर मरण आले आहे. तसेच दुर्घटनाग्रस्त बोटीमधील २ पोलीस अंमलदार यांना वाचवण्यात यश आले, अशी माहिती अतिरिक्त पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस दल यांनी दिली आहे.

या घटनेची माहिती प्राप्त होताच महसूल मंत्री व अहमदनगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, आ. किरण लहामटे, पोलीस महासंचालक श्रीमती रश्मी शुक्ला, राज्य राखीव पोलीस बलाचे अपर पोलीस महासंचालक चिरंजीव प्रसाद, व स्थानिक प्रशासकीय अधिकारी यांनी घटनास्थळी भेट दिली व वीरमरण आलेल्या अधिकारी व अंमलदार यांचे पार्थिवावर शासकीय इतमामात श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

# .... तर घाटकोपरची होर्डिंग दुर्घटना टाळता आली असती !

मुंबईच्या घाटकोपरमधील पेट्रोलपंपाजवळील अनधिकृत होर्डिंग पडून झालेल्या दुर्घटनेने प्रशासन खडबडून जागे झाले. मुंबईतील समस्त होर्डिंग्सचे स्टक्चरल ऑडिट झाले आहे का हे तात्काळ तपासण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. या तपासणीत मुंबईतील रस्त्यालगतच्या अनेक होर्डिंग्स या अनधिकृतपणे बांधल्या गेल्याचे लक्षात येत आहे. मुंबईतील या घटनेने संपूर्ण राज्यभरातील प्रशासकीय यंत्रणा कामाला लागल्या आहेत. राज्यभरात अशा भव्यदिव्य अनधिकृत होर्डिंग्स मोठ्या प्रमाणात उभारल्या गेल्या असल्याचे यामधून निदर्शनास येत आहे. या अनधिकृत होर्डिंग्स कोणाच्या आशीर्वादाने उभारल्या गेल्या आहेत यावरून राजकारण सुरु झाले होते. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मिळालेल्या या संधीचा लाभ घेत परस्पर विरोधी पक्षांनी एकमेकांवर चिखलफेक करून या घटनेचे भांडवल करण्याचा प्रयत्न केला होता. मुंबईत अशा प्रकारच्या अनधिकृत होर्डिंग्स उभ्या राहण्यामध्ये मुंबई महापालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचा हात असल्याचा आरोप केला जात आहे. याकडेही मुख्यमंत्र्यांनी लक्ष द्यायला हवे. उशिरा का होईना प्रशासन कामाला लागले असल्याचे समाधान नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे. घाटकोपर येथे घडलेली होर्डिंग दुर्घटना अत्यंत दुर्दैवी होती; मात्र प्रशासन जर वेळेवर जागे झाले असते, तर घाटकोपरची घटना सुद्धा टाळता आली असती. मृतांचे जीव वाचले असते, वित्तीय हानी टाळता आली असती. पुण्यात 17 एप्रिलला वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस कोसळल्याने उबाळेनगर बसथांब्याजवळील एक भव्य होर्डिंग रस्त्यावर कोसळली होती. यामध्ये जीवित हानी झाली नसली तरी चार ते पाच चारचाकी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. मुख्य रस्त्यावरच होर्डिंग कोसळल्याने यावेळी प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. ४ ते ५ किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. याच दरम्यान परिसरातील विद्युत प्रवाह खंडित झाल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले होते. तासनतास गाड्या एकाच जागी थांबल्याने नागरीकांचे अतोनात हाल झाले होते. अर्थात होर्डिंग पडण्याची पुण्यातील ही पहिली घटना नव्हती. गेल्यावर्षी पिंपरी चिंचवड शहरातील रावेत किवळे परिसरात लोखंडी होर्डिंग कोसळून पाच नागरींकांचा बळी गेला होता. त्यानंतर पुणे महानगरपालिकेने जिल्ह्यातील अनधिकृत होर्डिंगच्या विरोधात जोरदार कारवाई केली होती. ज्यामध्ये 1200 हुन अधिक अनधिकृत होर्डिंग्स जमीनदोस्त करण्यात आल्या होत्या. या दोन घटनेतून राज्य प्रशासनाने बोध घेऊन अनधिकृत होर्डिंग्सच्या विरोधात याआधीच कारवाई आरंभली असती तर कदाचित घाटकोपरची होर्डिंग दुर्घटना घडण्याआधीच जमीनदोस्त करण्यात आली असती. घाटकोपरच्या घटनेत जीवित हानीसह वित्तीय हानीही मोठ्या प्रमाणात झाल्याने त्यानंतर राज्यभरातील रस्त्यालगतच्या होर्डिंग्सचा प्रश्न ऐरणीवर आला आणि राज्यभरात अनधिकृत होर्डिंग्सवर कारवाईला आरंभ झाला. प्रशासनाच्या निद्रिस्तपणामुळे 16 निष्पाप नागरिकांचा अकारण जीव गेला, 80 हुन अधिक नागरिक जखमी झाले तर कोट्यवधी रुपयांची हानी झाली. ही हानी नक्कीच टाळता आली असती.

# मुलांनो मैदानात या......

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ



घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या भोवरे विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात



### उत्तनवासीय विजेच्या लपंडावाने त्रस्त; उन्हाळ्यात गरमीनं लोक हैराण

● मीरारोड प्रतिनिधी : यंदा उन्हाळा तीव्र असल्याने आधीच उकाड्याने त्रासलेल्या उत्तनवासियांना गेल्या काही दिवसांपासून विजेच्या खेळखंडोबाने आणखी जाच सहन करावा लागत आहे.

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन भागातील मच्छीमार , शेतकरी आणि अन्य रहिवाशी हे वीज पुरवठा सातत्याने खंडित होत असल्याने संतप्त आहेत. येथील माजी नगरसेविका शर्मिला बगाजी यांनी सांगितले कि , गेल्या ४ दिवसां पासून विजेचा लपंडाव सुरु आहे . वीज येते - जाते . त्यातच काल रात्री एका विजेच्या लाल बॉक्स मध्ये स्फोट सारखे जाणवल्याने लोकं घाबरली . दिवसा तर वीज जात असतेच पण रात्री देखील वीज गुल होत असल्याने लोकांची उकाड्यामुळे झोप उडाली आहे.

# अडीच वर्षांपूर्वी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या 'त्या' निर्णयाची अंमलबजावणी का झाली नाही ?- अंबादास दानवे

● डोंबिवली प्रतिनिधी : सोनारपाडालगत असलेल्या अंबर (अमुदान) केमिकल कंपनीच्या रिऍक्टरचा स्फोट झाल्याची घटना गुरुवारी घडली. त्या घटनेत ११ कामगारांचा मृत्यू झाल्याने शुक्रवारी विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी घटनास्थळीची पाहणी केली.

त्यावेळी मध्यमांशी बोलताना दानवे यांनी थेट महायुतीवर टीका केली. अडीच वर्षापूर्वी येथील पाच केमिकल कंपनीचे स्थलांतराचा निर्णय झाला होता, मात्र तरीही आताचे सरकार अपघाताची वाट पाहत होते का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ते म्हणाले की,अडीच वर्षापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एका घटनेमुळे डोंबिवलीत अशा कंपन्याची पाहणी केली होती. त्यावेळी पाच केमिकल कंपन्यांचे स्थलांतर करण्याचा त्या सरकारने निर्णय घेतला होता. त्यानंतर सरकार बदलले, मात्र आताच्या महायुतीच्या सरकारने याकडे का लक्ष दिले नाही. गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे घटनास्थळी आले होते. त्यांनी कंपन्यांन्या स्थलांतरीत करण्याचे जाहीर केले असले तरी इतके दिवस हे सरकार का शांत बसले होते. हे सरकार अपघाताची वाट पाहत होते का? असे ते म्हणाले. या भीषण स्फोटाबाबत आम्ही सरकारला जाब विचारत आहोत. उद्योग व्यवसायांना सुरक्षा देणे ही जबाबदारी एमआयडीसी व महापालिकेचीही आहे. डोंबिवलीत याधीही स्फोट झाले होते.

बॉयलरबाबत धोरण असले तरी रिऍक्टरबाबत अद्याप सरकारचे कोणतेही धोरण नाही. रिऍक्टरबाबत सरकारने धोरण आखावे अशी मागणी त्यांनी केली. पुढे दानवे यांनी आद्योगिक सुरक्षीततेसाठी असलेल्या डिश विभागावरहि तशोरे ओढले. या घटनेला फक्त कारखान्याचे मालकच नव्हे तर औद्योगिक सुरक्षा विभागहि जबाबदार आहे. घातक केमिकल वापरणे कारखाने गुन्हा आहे. ज्या कंपनीत रिऍक्टरचा वापर होतो त्याठिकाणी टेक्निकल माणूस असलाच पाहिजे असा नियम आहे. पण इकडे तसे काही दिसत नाही. सध्या कामगारांचे काम नाही. रिऍक्टर कुठून खरेदी केले जाते? कधी खरेदी केले? कुठे लावले जाते नोंद होऊ शकते.



■ आता कोणतेही धोरण नसल्याने सरकारकडे माहिती नाही.वास्तविक पाहता ओद्योगिक सुरक्षा विभागाने दर महिन्याला पाहणी करून तपासणी केली पाहिजे, त्याचे रिपोर्ट सादर केले पाहिजे. परंतु सरकारचे डिश विभाग फक्त नुसता कागदावर आहे. ते खाते मजबूत करावे किंवा ते खातेच नसावे असा टोला त्यांनी लगावला. त्यावेळी त्यांच्या समवेत वैशाली दरेकर, ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख सदानंद थरवळ आदी उपस्थित होते. दरम्यान त्यांनी नुकसान झालेल्या अन्य काही कंपन्यांच्या मालकाशी संपर्क साधून त्यांना धीर दिला. या घटनेचे गंभीर दाखल घेत कारखानदारावर गुन्हा दाखल करून अटक केली पाहिजे. औद्योगिक विभागाच्या अधिकाऱ्यांची, कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी लागेल. यात पर्यावरण विभागाचाही भूमिका आहे. या सर्व विभागाची चौकशी होणे आवश्यक आहे. आम्ही सरकारला चौकशी करायला भाग पाडू असे ते म्हणाले.

## मुंब्र्यातील खाडीत मृतदेह आढळला



● मुंब्राःयेथील खाडीमध्ये शुक्रवारी सकाळी अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला.पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला.

मुंब्रा शहरातील रेतीबंदर परीसरातील खाडी जवळील आत्माराम विसर्जन घाटा जवळ शुक्रवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास अंदाजित ४० ते ४५ वर्षे वयाच्या अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला. पोलिस कर्मचारी शंकर वायकर यांनी याबाबतची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाला दिली.माहिती मिळताच घटनास्थळी पोहचलेल्या आपत्ती व्यवस्थापन कक्षातील कर्मचारी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी स्थानिक मच्छिमाराच्या मदतीने मृतदेह खाडी बाहेर काढून तो पोलिसांच्या ताब्यात दिला.

पोलिसांनी कायदेशीर कार्यवाहीची पूर्तता करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवला असल्याची माहिती ठामपाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षातील अधिका-यांनी दिली.आढळून आलेला मृतदेह कुणाचा होता याचा तपास पोलिस करत आहेत.

## ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थांनी करियर कशात आहे याचा प्रथम अभ्यास करावा - ब्रिगेडीयर सुधीर सावंत यांचे प्रतिपादन!

● मुरबाड - ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांनी आपले करियर कशात आहे याची निवड प्रथम करावी व अभ्यास करावा असे प्रतिपादन माजी आमदार/खासदार तथा कर्नल सुधीर सावंत यांनी मुरबाड येथे केले. मुरबाड येथे श्री चैतन्यईश करियर अकॅडमीचे उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मुरबाड सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी भारतीय प्रशासकीय सेवेत गेला पाहिजे त्यासाठी मुरबाड मध्ये युपीएससी , एमपीएससी व डिफेन्सचे विद्यार्थी तयार झाले पाहिजेत हे ध्येय उराशी बाळगून चैतन्य शिवाजी केदार या तरुणाने ही अकॅडमि सुरु केली आहे. यावेळी बोलताना सुधीर सावंत यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महा राजांचा तुम्ही अभ्यास करावा. जग बदलत आहे, आर्मी मध्ये जाताना ही परीक्षा



द्यावी लागते. तुमच्यात १४ नेतृत्व गुण पाहिजेत, जे महाराणी ताराबाई मध्ये होते. भारतीय सैन्यात मुली नाहीत ही खंत मी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधीकडे व्यक्त केली आणी तेव्हा पासून मुलींची भरती होऊ लागली असे सुधीर सावंत यांनी सांगितले. तर शहापूरचे रहिवाशी असलेले व सध्या पालघर येथे उपायुक्त असलेले राजेश विशे यांनीही उपस्थित विद्यार्थी व पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी विशे यांनी आपण कशा प्रकारे अभ्यास व परीक्षा देत गेलो हे स्वानुभवा सह सांगितले. चैतन्य याचे वडील शिवाजी केदार वनविभागात नोकरीला असल्याने वनविभागाचे माजी अधिकारी भास्कर वाळिंबे, किशोर ठाकरे, चंद्रकांत शेळके तसेच दिगंबर घुडे उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या उदघाटनासाठी अकॅडमिच्या सचिव रुपाली निलेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते मोहन भावार्थे, रवींद्र चंदणे, मिलिंद मडके, जि. प. शिक्षक कृष्णकांत मलिक, भालचंद्र गोडांबे, राजकुमार कडवं, पत्रकार यांच्यासह मोठया संख्येने विद्यार्थी, पालक उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिव व्याख्यात्या करुणा गगे यांनी केले तर मुरबाड मध्ये अधिकारी घडविण्याचे उद्देश ठेवून श्रीचैतन्य ईश करिअर अकॅडमीचे दिमाखदार उद्घाटन गुरुवारी करण्यात आले आहे.


## स्ट्रॉंग रुम भागात पुन्हा ठेकेदाराकडून खोदकाम

### विद्युत वाहिनी तोडल्याने महावितरणकडून ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल



● ठाणे : घोडबंदर येथील कासारवडवली भागात एका शाळेमध्ये स्ट्रॉंग रुम तयार करून येथे मतदान यंत्रणा ठेवण्यात आल्या आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे येथील स्ट्रॉंग रुममध्ये आहे. येथील विद्युत पुरवठा खंडीत होऊ नये म्हणून महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कासारवडवली भागात कोणत्याही प्रकारचे खोदकाम करू नये असे आदेश ठेकेदारांना दिले आहेत. असे असतानाही बुधवारी एमएमआरडीएच्या ठेकेदाराने रस्ते खोदकाम करताना महावितरणची विद्युत वाहिनी तोडली. ही वाहिनी स्ट्रॉंग रुमला विद्युत पुरवठा करणारी पर्यायी विद्युत वाहिनी होती. सुदैवाने स्ट्रॉंग रुममधील विद्युत पुरवठा सुरळीत होता.

## ठाणे जिल्ह्यात आरटीईसाठी ११ हजार अर्ज दाखल, अर्ज भरण्याची ३१ मे अंतिम तारीख




● ठाणे : शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश प्रक्रियेच्या नव्या नियमावलीला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. पुन्हा पूर्वीच्या नियमावली नुसार प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी १७ मे पासून अर्ज मागविण्यात येत आहेत. ठाणे जिल्ह्यातून आरटीई साठी ६४३ शाळा पात्र असून ११ हजार ३७७ जागांसाठी ही प्रक्रिया पार पडणार आहे. गेल्या आठवड्याभरात ११ हजार ४०४ बालकांचे अर्ज दाखल झाले आहेत. पालकांना ३१ मेपर्यंत आरटीईच्या संकेतस्थळावर आपल्या बालकाची नोंदणी करता येणार आहे, अशी माहितीठाणे जिल्हा शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

सन २०२४ – २५ या शैक्षणिक वर्षाकरिता राबविण्यात येणाऱ्या आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत राज्य सरकारने नवे बदल केले होते. या नव्या नियमावलीत विद्यार्थी राहत असलेल्या एक ते तीन किमी परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या, जिल्हा प्रशासनाच्या किंवा अनुदानित शाळांमध्येच प्राधान्याने मुलांना प्रवेश घ्यावा लागणार होता.

## ठाणे, पालघरच्या उपेक्षित भागांचा विकास महत्त्वाचा

● ठाणे : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईलगतचा विकसित जिल्हा अशी ठाण्याची ओळख आहे. असे असले तरी जिल्ह्याच्या शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागांत आजही रस्ते, आधुनिक आरोग्य सुविधा, उच्च दर्जाचे शिक्षण आणि मुबलक पाणी यांची वानवा असल्याचे दिसते. दुसरीकडे विकासाचा वेग वाढवण्यासाठी ठाणे जिल्ह्यातून विभाजित झालेला पालघर आजही पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी चाचपडताना दिसत आहे. पक्क्या रस्त्यांची कमतरता, रोजगारक्षम



उद्योगांची वानवा तसेच बालकांमध्ये कुपोषणाची समस्या, दुर्गम भागात विजेचा अभाव यांसारखे प्रश्न आजही पालघर जिल्ह्याला भेडसावत आहेत. काही दशकांपूर्वी ठाणे जिल्ह्यात ठाणे वागळे इस्टेट, अंबरनाथ, बदलापूर, टीटीसी, महापे, नवी मुंबई, भिवंडी येथे उद्योग, कारखान्यांची उभारणी झाली. अंबरनाथ औद्योगिक वसाहत आशिया खंडातील मोठी म्हणून नावारूपाला आली. यामुळे राज्यातील कामगार वर्गाचा ठाणे जिल्ह्याकडे ओढा वाढला. लोकसंख्या वाढत गेली. त्यामुळे जिल्हयाच्या पायाभूत सुविधांवर ताण येऊ लागला. भौगोलिकदृष्ट्या ३३ व्या क्रमांकावर असलेला ठाणे जिल्हा लोकसंख्येच्या बाबतीत मात्र तिसऱ्या स्थानी आहे. जिल्ह्यातील ६८ टक्के जनता शहरी भागांत राहते. त्यामुळे आपसूकच कारखाने, अत्याधुनिक रुग्णालये, शिक्षण संस्था यांची प्रामुख्याने शहरी भागात उभारणी झाली आणि ग्रामीण भागाकडे काही प्रमाणात दुर्लक्ष झाले. यामुळे बारवी, भातसा यांसह अनेक धरणे ठाणे जिल्ह्यात असतानाही मुरबाड, शहापूर हा ग्रामीण पट्टा कायमचा पाणीटंचाईच्या झळा सोसताना दिसतो. आरोग्य आणि रस्त्यांची सुविधा दुरावस्थेत असल्याने रुग्णांना आणीबाणीच्या स्थितीत हाल सोसावे लागत असल्याचेही अनेकदा दिसते. यामुळे शहरी भागासह ग्रामीण भागाकडेदेखील शासकीय आणि राजकीय यंत्रणांनी लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

# ठाणे जिल्ह्यात पाणी टंचाईच्या झळा तीव्र; शहापूर, मुरबाडला ४७ टॅंकरने पाणी पुरवठा

● ठाणे प्रतिनिधी : हर घर नळ! असे म्हणत नळाव्दारे मुबलक पाणी पुरवठा होत असल्याचे भासवत यंदा लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. मात्र कधी नव्हे ते यंदा जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड या दुर्गम, ग्रामीण भागात सर्वाधिक म्हणजे ४७ टॅंकरने पाणी पुरवठा करून ग्रामस्थांची तहाण भागवली जात असल्याचे ठाणे जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ठ करण्यात आले आहे.

मुंबई, ठाणे या मोठ्या महानगरांना पाणी पुरवठा करून ठाणे जिल्ह्यातील ग्रामस्थ मात्र स्वत: तीव्र पाणी टंचाईला तोंड देत आहेत. यंदा अन्य वर्षांच्या तुलनेत मात्र पाणी टंचाई अधीक तीव्र झाल्यामुळे गांवापाड्यातील रहिवाशी त्रस्त आहेत. शहापूर, मुरबाड हे तालुके तीव्र टंचाईला तोंड देत आहेत. तब्बल २१७ गांवपाड्यांमध्यील ७३ हजार ५७७ ग्रामस्थांना पाणी टंचाईच्या झळा सोसाव्या लागत आहेत. गेल्या वर्ष या दोन तालुक्यात ४४ टॅंकरने गांवपाड्यांना पाणी पुरवठा झाला होता. त्यात वाढ होऊन तब्बल ४७ टॅंकर या ग्रामस्थांना यंदा पाणी पुरवठा करीत असल्याचे वास्तव उघड झाले आहे.

शहापूर हा शहारांना पाणी पुरवठा करणारा तालुका म्हणून प्रसिध्द आहे. यंदा या तालुक्यातील ४१ मोठे गांवे आणि १५१ आदिवासी पाडे आदी १९२ गांवपाडे यंदाच्या उन्हाळयात तीव्र पाणी टंचाईला तोंड देत आहे. गेल्या वर्षी या गांवपाड्यांना ३९ टॅंकरने पाणी पुरवठा करण्यात आला होता. यंदाचा उन्हाळा कडक असल्यामुळे त्यांचा पारा ३५ ते ४० अंशाच्या खाली येत नसलयामुळे पाणी समस्या गंभीर झाली. कधी नव्हे ते



यंदा शहापूरला ४२ टॅंकरने पाणी पुरवठा केला जात आहे. पावसाळा लांबल्यास या टॅंकरच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. फुगाळे, दांड, कळभोंडे, कोथळे, माळ, वहिगांव, उमरावणे, उंबरखांड, पेंढाळघोळ, पपिळपाडा, पेंढरी, पळशीण, शीळ, गोलभण, जरंडी, पगिळवाडी, राहेडवहाळ आदी ६० हजार ४९ लोकसंख्येच्या १५१ गांवे आणि १९२ पाड्यांना ४२ टॅंकरने शहापूर तालुक्यात पाणी पुरवठा सुरू आहे.

मुरबाड तालुक्यांमधील १२ मोठी गांवे आणि १३ आदिवासी पाडे आदी २५ गांवपाडे यंदा तीव्र पाणी टंचाईला तोंड देत आहेत. त्यांना तब्बल पाच टॅंकरने पाणी पुरवठा सुरू आहे. गेल्या वर्षी चार टॅंकरेने पाणी पुरवठा करण्यात आला होता. मात्र यंदा टंचाईच्या गांवपाड्यांसह टॅंकरच्या संख्येत मोठी वाढ झालेली आढळून आली आहे. यंदाच्या या टंचाईच्या झळा मोहघर, तोडली, फांगुळगव्हाण, भोरांडे, साकुर्ली, साजई, झाडघर, फणसोली, डेहणोली, घागुरली, पऱ्हे, देवपेख् आदी १२ गांवे आणि १३ पाड्यांनड्तीव्र टंचाई सुरू आहे.

## शिक्षकांच्या गणवेशासाठी मतदान, नवी मुंबई महापालिका शिक्षकांची प्रक्रियेला सुरुवात

● नवी मुंबई : राज्य शासनाच्या १५ मार्चच्या शिक्षकांच्या गणवेशाबाबतच्या परिपत्रकानुसार नवी मुंबईतही शिक्षकांचा गणवेश निश्चित करण्यासाठी ऑनलाइन लिंक पाठवून शिक्षकांच्या मतदानाचा कौल घेतला जाणार आहे. त्याची सुरुवात नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने केली असून ४६० शिक्षकांनी लिंकद्वारे गणवेशाबाबत मतदानाचा कौल दिला आहे.

शिक्षकांचा संबंध हा भावी पिढीशी येत असून त्यांच्या गणवेशाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम करीत असताना शिक्षकांनी वेशभूषेबाबत जागरूक राहून आपली वेशभूषा ही आपल्या पदास अनुरूप असावी असे पत्रकात म्हटले असून विद्यार्थी हे अनुकरणप्रिय असल्याने शिक्षक व शिक्षिकांना गणवेशाबाबत योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षकांच्या गणवेशाची बाब विचारात घेता गणवेश कसा असावा त्याचा रंग कसा असावा याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

नवी मुंबई महापालिकेनेही आपल्या अखत्यारीत येणाऱ्या पालिकेच्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचा गणवेश निश्चित केल्याप्रमाणे त्याचा रंगनिश्चितीसाठी लिंकद्वारे मतदानाचा कौल घेतला जात आहे. त्यात महिला शिक्षकांनी साडी अथवा सलवार, चुडीदार, कुर्ता व दुपट्टा तर पुरुष शिक्षकांनी जीन्स, टी शर्ट न वापरता पॅन्ट-शर्ट असा



पेहराव करावा तसेच चित्र-विचित्र नक्षीदार कपडे परिधान करून नयेत, असे शिक्षण विभागाच्या आदेशात म्हटले आहे. शिक्षकांनी कोणत्या रंगाचा पेहराव करावा हे त्या शाळेने निश्चित करावे असे सांगितले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेतील शिक्षण विभागाने महिला शिक्षकांसाठीची साडी व कुर्ती तसेच पुरुष शिक्षकांच्या शर्टचा रंग निश्चित करण्यासाठी मतदान घेण्यासाठी संबंधित शिक्षकांना लिंक पाठवली आहे. त्यानुसार लिंकद्वारे साडी किंवा कुर्ती आणि शर्ट यांचा रंग निश्चित झाल्यावर त्या आधारे स्त्री शिक्षकांसाठीचा ब्लाऊज व सलवार तसेच पुरुष शिक्षकांच्या पॅन्टचा रंग निश्चित करण्यासाठी मतदान घेण्यात येणार आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेतील सर्व शिक्षकांच्या मोबाइलवर फॉर्मची लिंक पाठवण्यात आली असून हा फॉर्म तात्काळ भरून देण्याचे आवाहन देण्यात आले आहे.

**पूर्वप्राथमिक शिक्षक - १६५**
**प्राथमिक शिक्षक - ८५९**

## उन्हाळ्यात पीरियड्स हायजीनकडे करू नका दुर्लक्ष

उन्हाळ्यात शरीराला घाम येतो. त्यामुळे व्हायरल इन्फेक्शनचा धोका वाढू शकतो. प्रामुख्याने त्वचेशी संबंधित विकार बळावतात. यामुळे परियडस् दरम्यान महिलांनी घट्ट अंतर्वस्त्र घालू नये. ज्यामुळे त्वचेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

**सॅनिटरी नॅपकिन्स** - सॅनिटरी नॅपकिन अर्धा तासाने किंवा फ्लो नुसार बदलत राहावे. खूप वेळ एकच पॅड वापरल्यास त्यावर बॅक्टेरिया तयार होतात. त्यामुळे चिडचिड, त्वचेवर लालसरपणा अशा अनेक समस्या निर्माण होतात.

**प्रायव्हेट पार्टची स्वच्छता** - उन्हाळयाच्या हंगामात, सॅनिटरी नॅपकिन फार वेळ राहील्यास त्यामध्ये बॅक्टेरियांची निर्मिती होते. त्याचे इन्फेशन होण्याचा धोका वाढतो. यामुळे प्रायव्हेट पार्टची योग्य स्वच्छता ठेवावी. त्यासाठी अँटिसेप्टिक पावडर वापरू शकता

**हायड्रेटेड रहा** - उन्हाळयात हायड्रेट राहण्याची गरज असते. शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यासाठी आणि शरीराचे पीएच संतुलन राखण्यासाठी दररोज किमान 8-10 ग्लास पाणी पिणे महत्वाचे आहे. बेरी आणि हर्बल पाणी प्यावे.

**सुती पॅन्टी** - उन्हाळयात सुती अंडरगारमेंट्स, विशेषतः कॉटन पॅन्टीज घालणे महत्त्वाचे आहे. उन्हाळयात कॉटन बॉटम वेअर्सही आरामदायक असतात. त्यामुळे त्वचा स्वच्छ आणि कोरडी राहण्यास मदत होते. या काळात कृत्रिम धाग्यांपासून बनवलेले कपडे आणि अंतर्वस्त्रे घालू नये. यामुळे बॅक्टेरिया वाढू शकतात. त्वचेवर खाज सुटणे आणि जळजळ होऊ शकते.



# अशोक सराफ, रोहिणी हट्टंगडी यांना मराठी नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर




मुंबई : मराठी तसेच हिंदी सिनेसृष्टी गाजवणारे याचसोबत गेली कित्येक दशके मराठी नाट्य सृष्टीची अविरत सेवा करणारे दिग्गज अभिनेते अशोक सराफ आणि ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांच्या कामगिरीचा सन्मान करण्यात आला आहे. त्यांना यावर्षीचा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यानंतर अनेक मराठी नाट्यप्रेमींकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. 14 जून 2024 रोजी संध्याकाळी 4 वाजता माटुंगामधील यशवंत नाट्य संकुलात अशोक सराफ आणि रोहिणी हट्टंगडी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

दरवर्षी नाट्य क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या रंगकर्मींचा मराठी नाट्य परिषदेच्या वतीने सत्कार केला जातो. याही वर्षी हा सन्मान सोहळा केला जाणार आहे. नुकतेच 100वे नाट्य संमेलन पार पडले. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला 'नाट्य कलेचा जागर' यातील सर्वोत्कृष्ट पारितोषिकप्राप्त एकांकिका, बालनाट्य, एकपात्री, नाट्यछटा, नाट्य संगीत पद गायन, नाट्य अभिवाचन कार्यक्रम सादर होणार आहेत. 14 जूनला यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल येथे संध्याकाळी 4 वाजता हे सर्व पुरस्कार दिले जाणार आहेत, अशी माहिती नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली.

### अशी आहे पुरस्कारप्राप्त सन्मानितांची यादी

- लीला मेहता पुरस्कृत भार्गवराम पांगे कार्यकर्ता पुरस्कार : गणेश तळेकर
- डॉ. न. अ. बरवे स्मृती पुरस्कार : प्रशांत जोशी
- कमलाकर वैशंपायन स्मृती पुरस्कार : दीपाली घोंगे
- कै. भालचंद्र त्र्यंबक जोशी स्मृती पुरस्कार : शशांक लिमये (सर्वोत्तम निवेदक)
- बाळकृष्ण भोसले स्मृती पुरस्कार : विजय जगपात (गुणी रंगमंच कामगार)
- वि.स. खांडेकर नाट्यसमीक्षा पुरस्कार : संजय देवधर (समीक्षण)
- अ. सी. केळुस्कर स्मृती पुरस्कार – गोविंद गोडबोले (बालरंगभूमीवरील योगदानानिमित्त)
- कै. विनय आपटे, कै. अविनाश फणसेकर आणि कै. भाई बोरकर स्मृती पुरस्कार : प्रायोगिक नाट्यसंस्था, अभिनय संस्था (कल्याण), अभिजीत झुंझारराव
- सर्वोत्कृष्ट नाट्य व्यवस्थापक : प्रणीत बोडके
- नाट्य मंदार पुरस्कार : अशोक ढेरे
- उत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार : अशोक बेंडखळे
- कामगार रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट लेखक पुरस्कार : श्याम आस्करकर
- विशेष पुरस्कार : स्व: रितेश सांळुके (कार्यकर्ता पुरस्कार)
- लोककलावंत पुरस्कार : सुनील बेंडखळे

## शाहरुखला मिळाला डिस्चार्ज



बॉलिवूडचा किंग खान शाहरुख हा नेहमीच चर्चेत असतो. यावेळीदेखील शाहरुख चर्चेत आला आहे तो त्याच्या बिघडलेल्या तब्येतीमुळे ! बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान हा अहमदाबादमध्ये कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि सनराइझर्स हैदराबाद यांच्या सामन्यासाठी पोहचला होता. यावेळी आपल्या टिमला सपोर्ट करताना शाहरुख खान दिसला. गेल्या दोन दिवसांपासून शाहरुख हा अहमदाबादमध्येच होता. प्रचंड ऊन असल्यामुळे त्याला डिहायड्रेशनचा त्रास झाला. केकेआरची मॅच संपल्यानंतर शाहरुख खान बराच वेळ मैदानात होता आणि चाहत्यांचे आभार मानत होता. मात्र 22 मेला सकाळी शाहरुखची तब्येत बिघडली.

अहमदाबादमध्ये आयपीएल मॅच पाहण्यासाठी गेलेल्या शाहरुखला अचानक त्रास होऊ लागल्याने त्याला अहमदाबादमधील केडी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले . ऊन लागल्याने, अर्थात उष्माघाताचा त्रास झाल्याने त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करून शाहरुखवर उपचार करण्यात आले. सध्या शाहरुख खानची तब्येत व्यवस्थित असल्याचं सांगितलं जातंय. मात्र, शाहरुख हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्याने त्याचे चाहते चिंतेत होते आणि त्याला लवकर बरं वाटावं अशी प्रार्थना सर्वजण करत होते.

चाहत्यांच्या या प्रार्थनेला अपेक्षित यश मिळाल्याचं आता दिसून येतंय. कारण तब्बल 30 तासांनंतर शाहरुख खानला रूग्णालयातून डिस्चार्ज मिळाला. आणि त्याची तब्येत स्थिर असल्याचं देखील सांगितलं जातंय. रूग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर शाहरूख मुंबईत परतलादेखील आहे. यावेळी त्याचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

## दिनविशेष

**घटना**

२०००: कोची झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.

१९९८: मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक विलीनीकरण आहे.

१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.

१९९०: लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.

१९७६: होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.

१९५५: एअर इंडिया ची मुंबई - टोकियो विमानसेवा सुरू झाली.

१९४६: सोनी कंपनी ची स्थापना झाली.

**जन्म**

१९६७: राम नरेश रावत भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (निधन: ४ सप्टेंबर २०२२)

१९४९ : गोपाल निमाजी वाहनवती भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: २ सप्टेंबर २०१४)

१९४८: नित्यानंद हळदीपूर - मैहर घराण्याचे बासरी वादक

१९३२ : राज मोहन वोहरा लेफ्टनंट जनरल महावीरचक्र, परम विशिष्ट सेवा पदक (निधन: १४ जून २०२०)

१९२३ : आत्माराम गोविंद भेंडे - मराठी नाट्य अभिनेते व दिग्दर्शक

१९१२: पन्नालाल पटेल - गुजराथी कथा-कादंबरीकार ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: ६ एप्रिल १९८९)

**निधन**

२०२२: पार्थ घोष - पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार

२००२: दुर्गाबाई भागवत- जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्म: १० फेब्रुवारी १९१०)

२००१ : विभावरी शिरूरकर - लेखिका (जन्म: १८ मार्च १९०५)

२००१: प्रेम धवन - भारतीय गीतकार पद्मश्री (जन्म: १३ जून १९२३)

१९९१: गोपाल नरहर नातूपुणे - लोककवी (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

१९९१: मनमोहन नातू - लोककवी गोपाळ नरहर तथा (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

# धोनीच्या चाहत्यांना सुखद धक्का

## थाला स्वत: चा संघ स्थापन करणार

नवी दिल्ली: चेन्नई सुपर किंग्स हा संघ चालू असलेल्या IPL 2024 मधून बाहेर गेला आहे. RCB आणि CSK मध्ये झालेल्या सामन्यात CSK चा पराभव झाला. आता यानंतर MS धोनीने केलेल्या Facebook पोस्टची जोरदार चर्चा सुरू आहे. धोनी आता स्वत: संघ स्थापन करणार की काय? अशा आशयाचीच ती पोस्ट आहे. त्यामुळे आता जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत.

महेंद्रसिंग धोनी हा क्रिकेटपटू आणि एक व्यक्ती म्हणून त्याच्या असामान्य वैशिष्ट्यांसाठी प्रसिद्ध आहे. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात आकर्षक घटकांपैकी एक म्हणजे त्याच्या दिग्गजांच्या पुढील वाटचालीचा कोणीही अंदाज लावू शकत नाही.

MSD चे निर्णय हे नेहमीच अतिशय प्रोफेश्नल आणि उत्सुकता वाढवणारे असतात.आताही त्याने तसाच काहीसा निर्णय घेतल्याचं दिसत आहे. त्याचचं एक उदाहरण घ्यायचं झालं तर, 2019 च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेनंतर, भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करेल असे सर्वांनी गृहीत धरले होते, परं त्याने आणखी एक वर्ष आपल्या संघासाठी खेळणं योग्य मानलं आणि तो खेळला.

इतकंच काय तर आता IPL 2024 च्या हंगामात त्याने CSK चं कर्णधारपदाचा राजीनामा देऊन चाहत्यांना आश्चर्यचकित केलं होतं.

मी माझी स्वतःची टीम सुरू करत आहे.”- एमएस धोनी

एमएस धोनीच्या सर्व समर्थकांसाठी आनंदाची बातमी आहे. कॅप्टन कूल इंडियन प्रीमियर लीगमधून निवृत्ती जाहीर करेल याची सर्वांनाच भीती वाटत होती. इंटरनेटवरील सर्व पोस्ट पाहिल्या तर लोक त्याच्या निवृत्तीची अपेक्षा करत होते, परंतु त्याच्या निर्णयाने मात्र आता चाहते आश्चर्यचकित झाले आहेत.

धोनीने आपल्या फेसबूक पोस्टमध्ये मी माझी स्वत:ची टीम सुरू करत असल्याचं म्हटलंय. त्यामुळे ही टीम क्रिकेट संबंधित असून धोनी आयपीएलमध्ये टीम घेणार आहे का? अशी चर्चा रंगली आहे. तर दुसऱ्या बाजूला धोनी स्वत:चं आणखी काही सुरु करून तिथे आपली टीम आणणार असावा, अशीही चर्चा आहे.

2024 इंडियन प्रीमियर लीगमधून धोनीचा संघ CSK बाहेर पडला, पण तरीसुद्धा धोनीला असणार पाठिंबा मात्र कायम असल्याचं दिसत आहे. जेव्हा सीएसकेने आरसीबीचा सामना झाला, तेव्हा ते 13 गेममधून 14 गुणांसह आणि चांगल्या धावगतीने प्लेऑफमध्ये जाण्यासाठी योग्य असल्याचे दिसत होते. परंतु फाफ डु प्लेसिस आणि कंपनीकडून 27 धावांनी पराभूत झाल्याने ते स्पर्धेतून बाहेर पडले. व्हर्च्युअल नॉकआउट सामन्यात 218 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना CSK ला गुणांच्या क्रमवारीत चौथ्या स्थानावर टिकून राहून प्लेऑफमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी फक्त 201 धावांची गरज होती.



## उन्हाळ्यातील चहाच्या तलफीला रीफ्रेशिंग ड्रिंक्सचा पर्याय



कडाक्याच्या उन्हामुळे अंगाची काहीली होत असून घराबाहेर पडणेही अशक्य झाले आहे. सततच्या उन्हाच्या झळांमुळे हवेतही उष्णता वाढली असून घामाच्या धारांनी सगळेच न्हाऊन निघत आहेत. अशा परिस्थितीत या ऋतूत निरोगी आणि फ्रेश राहण्यासाठी खरं तर आपल्या आहारात थंड पदार्थांचा समावेश करणे आवश्यक आहे. मात्र, चहाप्रेमींसाठी हे कठीण असून या मोसमातही अनेकांना चहा सोडता येत नाही. अशा परिस्थितीत चहाप्रेमींसाठी रीफ्रेशिंग हर्बल ड्रिंक्स हा चहाचा उत्तम पर्याय ठरु शकतो.

थंड पेयांमुळे उष्णतेपासून आराम मिळण्यास मदत होते. यामुळे या दिवसात थंड पेय पिण्याचा सल्ला दिला जातो. यात प्रामुख्याने जर पेय हर्बल असतील तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदे होतात. कोणते आहेत हे ड्रींक्स ते पाहुया.

ॲपल आइस टी

उन्हाळयातील थकवा दूर करण्याबरोबरच मूड फ्रेश करण्यासाठी ॲपल आइस टी चांगला पर्याय आहे.

काकडी पुदीना चहा

उन्हाळयात काकडी आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. काकडी सलॅडमध्ये वापरली जाते. पण काकडी आणि पुदीनाच्या रसापासून चहाही तयार करतात. काकडी आणि पुदिन्याचा चहा उन्हाळयात हायड्रेट करतो.

पेपरमिंट चहा

पेपरमिंट चहा तुम्हाला उष्णतेपासून वाचवण्यास मदत करतो. पेपरमिंट थंड गुणधर्मासाठी ओळखले जाते. यामुळे उन्हाळयात शरीराला थंडावा देण्यासाठी पेपरमिंट उपयुक्त आहे.

हिबिस्कस चहा

उन्हाळयात हिबिस्कस चहा हा उत्तम पर्याय ठरू शकतो. अतिशय आकर्षक दिसणारा हा चहा नैसर्गिकरित्या थंड असतो. हे अँटिऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे आणि तिखट चव असल्यामुळे उन्हाळयात ते एक परिपूर्ण पेय बनते.

लेमनग्रास चहा

उन्हाळयात तुम्ही तुमच्या नेहमीच्या चहाच्या जागी लेमनग्रास चहा देखील घेऊ शकता. त्याच्या सौम्य आंबट चव आणि नैसर्गिक थंड प्रभावामुळे, हे उन्हाळयासाठी एक उत्तम पर्याय असल्याचे सिद्ध होते. सामान्यतः लोकांना ते बर्फाचा चहा म्हणून प्यायला आवडते.

## राशि भविष्य

**मेष** - अनपेक्षितपणे प्रवास करावा लागल्यामुळे दमून जाल. तेलाने मसाज करून शरीराच्या स्नायूंना आराम द्या. आज धन लाभ होण्याची शक्यता आहे परंतु, असे होऊ शकते की, आपल्या रागीट स्वभावाच्या कारणाने तुम्ही पैसा कमावण्यात सक्षम होणार नाही. कुटुंबातील ताणतणावांमुळे तुमचे लक्ष विचलित होऊ देऊ नका.

**सिंह** - तुमची देण्याची वृत्ती म्हणजे अप्रत्यक्ष मदत करण्याची वृत्ती होय. त्यामुळे शंका, निरुत्साह, अश्रद्धा, मत्सर, हेवा, गर्व यापासून तुम्ही मुक्त व्हाल. तुमचे वाचवलेले धन आज तुमच्या कमी येऊ शकते परंतु या सोबतच याच्या जाण्याचे तुम्हाला दुःख ही होईल. कुटुंबीय आणि मित्रांबरोबर आनंदी क्षण मिळवाल.

**धनु** - बोलण्यापूर्वी दोनवेळा विचार करा. तुमच्या बोलण्यामुळे अनवधानाने कुणाच्या तरी भावना दुखावल्या जातील. आज जवळच्या मित्राच्या मदतीने काही लोकांना आज चांगले धन लाभ होण्याची शक्यता आहे. हे धन तुमच्या बऱ्याच समस्यांना दूर करू शकते. घरातील सणांचे उत्सवाच वातावरण तुमच्यावरील दडपण कमी करेल.

**वृषभ** - आजच्या दिवशी आपल्या आरोग्याची कसलीही काळजी करण्याची गरज नाही. आपल्या सोभवतालचे लोक आपले मनोधैर्य आणि चैतन्य वाढवतील. पुगतन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. नातेवाईक तुमच्यासाठी अनपेक्षित भेटवस्तू आणतील पण तुमच्याकडूनही काही मदतीची अपेक्षा ठेवतील.

**कन्या** - आज तुम्ही निवांत राहण्याची गरज आहे आणि त्यासाठी जवळचे मित्र व कुटुंबातील सदस्य यांच्यासोबत आनंद लुटा. जर तुम्ही लोन घेणार असाल आणि बऱ्याच दिवस याच कामात असाल तर, आजच्या दिवशी तुम्हाला लोन मिळू शकते. एका मित्र/मैत्रिणीच्या समस्येमुळे तुम्हाला वाईट वाटेल आणि त्यांची चिंता वाटेल.

**मकर** - तुम्ही संपूर्ण आराम करायला हवा अन्यथा थकव्यामुळे तुमच्या निराशावादी दृष्टिकोन कार्यरत होऊ शकतो. आज तुम्ही मित्रांसोबत पार्टीमध्ये खूप पैसा खर्च करू शकतात परंतु, तरी ही तुमचा आर्थिक पक्ष आज मजबूत राहील. तुमच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या लोकांशी बोलताना तुम्हाला तुमचे मुद्दे मांडण्यात खूप अडचणी येतील.

**मिथुन** - तुमचा जबरदस्त लवचिकपणा आणि निडरपणा तुमच्या मानसिक ताकद अधिक वाढविणारा ठरेल. कोणतीही परिस्थिती ओढवली तरी अशी खंबीर भूमिका तुम्हाला ती परिस्थिती तुमच्या नियंत्रणात ठेवण्यासाठी सहाय्यकारी ठरेल.

**तूळ** - अमर्याद ऊर्जा आणि उत्साह तुमच्यात सतत सळसळत राहील. त्यामुळेच मिळालेल्या प्रत्येक संधीचा तुम्ही योग्य फायदा घेऊ शकाल. ज्या व्यापाऱ्यांचे संबंध परदेशात आहे त्यांना आज धन हानी होण्याची शक्यता आहे म्हणून, आज विचार पूर्वक निर्णय घ्या. कुटुंबीय आणि मित्रांबरोबर आनंदी क्षण मिळवाल.

**कुंभ** - यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. बँकेसंदर्भातील व्यवहार काळजीपूर्वक हाताळा. एखाद्या धार्मिक स्थळी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा विचार पुढे येईल. आपल्या प्रिय व्यक्तीशी व्यक्तिगत भावना, गुपित शेअर करण्यासाठी हा काळ चांगला नाही.

**कर्क** - अध्यात्मिक व्यक्तीच्या शुभाशिर्वादामुळे तुमच्या मनाला शांतता लाभेल. ज्या लोकांनी अतीत मध्ये आपली धन गुंतवणूक केली होती आज त्या धनाने लाभ होण्याची शक्यता आहे. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ. तुमच्या प्रियजनांसोबत सहलीला जाऊन अमूल्य क्षण जगा, मजा लुटा.

**वृश्चिक** - दुसऱ्यांवर टीका करण्याच्या सवयीमुळे तुम्हालाही टीका सहन करावी लागेल. तुमची विनोदबुद्धी जागृत ठेवा आणि बचावात्मक पवित्रा घेऊ नका आणि तसे केले तर गुप्तपणे केल्या जाणाऱ्या तुमच्यावरील शेरेबाजीलाही तुम्ही निष्प्रभ करू शकाल.

**मीन** - आरोग्य चांगले राहील. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. तुम्ही पार्टी देण्याचा विचार करत असाल तर तुमच्या सर्वात चांगल्या मित्रांना बोलवा. तुमचे कौतुक करणारे अनेकजण असतील. तुमच्या जोडीदाराची एक विस्यमकारक बाजू तुम्हाला आज पाहायला मिळेल.

## रोडवेज सोल्यूशन्स इंडिया इंफ्रा लिमिटेडला ४,९०० करोड रुपयांच्या प्रकल्पांमध्ये यश



■ मुंबई : पुणे येथील अग्रणी पायाभूत सुविधा विकास कंपनी, रोडवेज सोल्यूशन्स इंडिया इंफ्रा लिमिटेडला हे जाहीर करताना आनंद होत आहे की तिला दोन महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सर्वात कमी बोली देणारी कंपनी म्हणून निवडण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) द्वारे सुरू केलेले हे प्रकल्प ४,९०० करोड रुपयांचे आहेत. ही कामगिरी कंपनीच्या सतत वाढीचे आणि संपूर्ण देशात मजबूत पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. MSRDC च्या संचालनाखाली या महत्त्वाच्या प्रकल्पांवर आमची वाटचाल सुरू ठेवण्यास आम्हाला खूप आनंद होत आहे. आमच्या सतत चांगल्या कामगिरी आणि आर्थिक बळकटी, नुकत्याच झालेल्या सभभाग भांडवलाच्या वाढीमुळे बळकट झाल्याने, आम्हाला पायाभूत सुविधा विकासातील नावीन्य आणि उत्कृष्टतेच्या सीमा ओलांडून जाण्याची परवानगी देते." असे रोडवे सोल्यूशन्स इंडिया इन्फ्रा लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री बी.के. सिंह यांनी सांगितले.

■ महाराष्ट्र राज्यात तालुका हवेली, जिल्हा पुणे मधील ग्राम वाल्टे (किमी ७२ + ०००) जवळून सुरू होऊन ग्राम लोणीकंद (किमी ४७+ ५००) वर संपणारा २४.५० किमी लांबीचा प्रवेश नियंत्रित पुणे रिंग रोड ईपीसी मोडवर बांधणे. या प्रकल्पाची किंमत २,२५१ करोड रुपये आहे. ही परियोजना पुणे शहराभोवतील संपर्कास सुधारण्यास आणि वाहतुकीची कोंडी कमी करण्यास मदत करेल.

# आता माघार नाही, जरांगेंचे आरक्षणासाठी पुन्हा आंदोलन

● छत्रपती संभाजीनगर : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी कंबर कसली आहे. गेल्या बऱ्याच दिवसांपासून शांत असलेले मनोज जरांगे पाटील आता पुन्हा एकदा मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी आमरण उपोषणाला बसणार आहेत. 04 पासून पुन्हा एकदा जरांगे पाटील उपोषणाला सुरुवात करणार असून आता आरक्षण मिळाल्याशिवाय माघार घेणार नसल्याचे त्यांच्याकडून स्पष्टपणे सांगण्यात आले आहे.

गुरुवारी मराठा आंदोलक मनजो जरांगे पाटील यांची छत्रपती संभाजीनगर येथे सभा पार पडली. या सभेच्या माध्यमातून त्यांनी राज्य सरकारवर आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. सरकारकडून मी मॅनेज होत नसल्याने त्यांच्याकडून माझ्या कुटुंबावर हल्ला करण्याचा डाव आखला जात आहे, असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटलांकडून



करण्यात आला आहे. जरांगे पाटलांना काही दिवसांपूर्वी प्रकृती अस्वस्थ्याच्या कारणामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु, त्यांना बरे वाटायला लागताच त्यांनी पुन्हा एकदा आपल्या दौऱ्यांना सुरुवात केली असून या माध्यमातून ते मराठा समाजाशी संवाद साधत आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथील सभेत बोलताना मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील म्हणाले की, माझ्या कुटुंबावर हल्ला करण्याचा डाव आखला जात आहे. इतके नीच सरकार मी कधी पाहिले नाही. मी डावाला लागलो, आता माझे कुटुंब लागले. माझे कुटुंब उद्याला जिवंत नसले तरी मी बाजूला हटणार नाही. मी माझ्या बापाला आणि बायकोला

### भुजबळांना फक्त खायची सवय

■ मंत्री, ओबीसी नेते छगन भुजबळ यांचा एकेरी उल्लेख करत मनोज जरांगे पाटील म्हणाले की, तो येवल्यावाला म्हणतो की, आम्ही एकटे 60 टक्के आहे. तू काय आम्हाला बधीर समजतो की काय? त्यानंतर म्हणे एसटी फुल भरलेली आहे. मी म्हटले मला दार उघडू दे. तू ते एसटीमध्ये एकटाच तंगड्या लांबून बसलाय तुला तंगडी सक्त बाहेर ओढतो. आमच्या हक्काचे आरक्षण आम्ही मागत आहोत. इतके दिवस इतरांनी खाल्ले आता आम्हाला द्या. तुझी नियत चांगली नाही, तुला फक्त खायची सवय लागली आहे. ओबीसी महामंडळ 80 टक्के तुम्ही खाऊन घेतले. तुमच्या आरक्षणाला धक्का लागत नाही. त्याचाच सगळ्यात जास्त मराठा आरक्षणाला विरोध आहे, असे म्हणत जरांगेंनी भुजबळांवर निशाणा साधला.

अगोदरच सांगितले आहे की डोळ्यात पाणी आणू नका. मी गेलो तरी माझ्या बापाला तीन मुले आहेत. माझे रक्षण करायला माझा समाज आहे. काही झाले तरी शांत राहा. उपोषणामुळे शरीर साथ देत नाही म्हणून तुम्हा सर्वांना जबाबदारी देतो. मी तुमच्यात असो किंवा नसो तरी समाज फुटू देऊ नका. तसेच, राजकीय लोकांसाठी फुटू नका. आमरण उपोषण होणारच आहे, असे जरांगे पाटील यांच्याकडून स्पष्टपणे सांगण्यात आले आहे.

मी थांबणार नाही...

मी यांच्याकडून मॅनेज होत नाही. ना पैशांनी, ना पदाने, म्हणून माझ्यावर सरकारला कारवाई करायची आहे. माझ्यावर चौकशी समिती नेमली गेली. पण मला तडीपार केले तर दुसऱ्या राज्यातील मराठे एकत्र करून आंदोलन करतील. जेलमध्ये टाकले तर कैदी एकत्र करून आतमध्ये मोर्चा काढेल, पण मी थांबणार नाही, असा इशाराच जरांगे पाटील यांच्याकडून देण्यात आला आहे.

## आरोग्य कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळणे बंद करा; सुरक्षा साधनांविना नालेसफाई



● पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात पावसाळापूर्व कामे सुरू केली आहे. नालेसफाईचे काम मोठ्याप्रमाणावर यांत्रिकी पद्धतीऐवजी कामगारांचा जीव धोक्यात घालून केले जात आहे. श्रीमंत आणि स्मार्ट महापालिका म्हणून बिरुद मिळविणारी महापालिका आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधणे पुरवित नसल्याचा आक्षेप कामगारांनीच नोंदविला आहे. 'ही कसली स्मार्ट सिटी, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळणे बंद करा, अशी मागणी कामगार करीत आहेत. पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या आरोग्यविभागात कायम तत्वावर १ हजार ८४५ कामगार, ३०५ घंटागाडी कामगार आणि ठेकेदारांकडील २ हजार ३९४ कामगार असे मनुष्यबळ आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ १८१ चौरस किलोमीटरपर्यंत विस्तारलेले आहे.

## परतीच्या प्रवासासाठी लांजा एसटी आगाराचे नियोजनच नाही

● लांजा : उन्हाळी सुट्टीसाठी गावी आलेल्या प्रवाशांच्या परतीच्या प्रवासासाठी लांजा आगाराने उन्हाळी जादा बसेस सोडण्याचे नियोजन न केल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. गतवर्षी नियोजन होते. यावर्षी जादा बसेस नसल्याने खासगी बस वाहतूकदारांना जादा व अवाजवी भाडे देऊन आधार घेवा लागत आहे. रत्नागिरी



विभागात जादा बसेस उपलब्ध करून देण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद नसल्याचे पुढे आले आहे. आगारकडे जादा फेऱ्यांसाठी बस नसल्याने आम्ही काहीच करू शकत नसल्याचे लांजा एसटी स्थानकातून सांगण्यात आले आहे. यावर्षी वाढत्या उष्मांकामुळे चाकरमानी हे सहपरिवार गावी मे महिना सुट्टीसाठी आले आहेत. लांजा तालुक्यात सर्व गावात मुंबई, पुणे येथील नागरिक मूळ गावी आले आहेत. कोकण रेल्वे आरक्षण फुल्लहोऊन गाड्यांना मोठी गर्दी असल्याने रेल्वेला पर्याय म्हणून एसटी बसेसना पसंती देत आहेत.

## गोंयकारवादी दणका; मुख्यमंत्र्यांचा हस्तक्षेप, आणखी एका कंपनीची नोकर भरती थांबली



● पणजी: इंडोको फार्मा कंपनीनंतर आता आणखी एका कंपनीने गोव्याबाहेर सुरू असलेली नोकर भरती प्रक्रिया थांबविली आहे. इन्क्युब इथिकल या फार्मा कंपनीच्या पुणे येथे सुरू असलेल्या मुलाखती मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्तक्षेपानंतर थांबविण्यात आल्या आहेत. गत्याच उद्योग आणि इतर राज्यांत नोकरभरतीच्या मुलाखती असे प्रकार आढळून आल्यामुळे गोवा फॉरवर्डचे आमदार विजय सरदेसाई, काँग्रेस पक्ष, रिव्होल्यूशनरी गोवन्स आणि आम आदमी पार्टीने सरकारवर जोरदार टीका केली होती.

इंडोको या कंपनीची मुंबई येथे नोकरभरती सुरू होती आणि यामुळेच विरोधकांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर इंडोको कंपनीने मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून मुलाखती रद्द केल्याची माहिती दिली होती. आता गोव्यात उद्योग असलेल्या पुणेस्थित इन्क्युब इथिकल या फार्मा कंपनीची पुणे येथे नोकरभरतीसाठी मुलाखती सुरू असल्याचे आढळून आले होते.

आमदार विजय सरदेसाई यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता परंतु संध्याकाळपर्यंत या कंपनीनेही मुख्यमंत्री सावंत यांना पत्र लिहून मुलाखती थांबविल्याची माहिती दिली. रोजगारासंबंधी विरोधक कमालीचे जागरूक असल्यामुळे इतर कंपन्या असे प्रकार करणार नाहीत.

अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आरजीचे नेते मनोज परब यांनी सिप्ला कंपनीने मुलाखती रद्द करा, अथवा गोमंतकीयांचा उद्रेकाला तयार राहा असा इशारा दिला आहे. कंपनीबाबत स्थानिक कामगारांना त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी वाढल्याचे ट्रीटमध्ये म्हटले आहे.

स्थानिक आमदारांनीही सांगावे : सरदेसाई

मडकईतील एन्क्युब इथिकल प्रा. लि. या कंपनीने २६ मे रोजी नोकरभरतीसाठी कोरेगाव (पुणे) येथील एका हॉटेलमध्ये मुलाखती ठेवल्या आहेत. त्यामुळे सरकारने आता खासगी क्षेत्रात गोमंतकीयांना नोकरीसंबंधी आपली ठोस भूमिका जाहीर करावी, अशी मागणी गोवा फॉरवर्डचे नेते, आमदार विजय सरदेसाई यांनी केली. ते म्हणाले की, राज्यात बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. येथील स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यास सरकार कमी पडते. हेच या डबल इंजिन सरकारचे अपयश आहे. मडकई मतदारसंघात ही कंपनी आहे.

## माथेरान मध्ये हत्तीरोग ची तपासणी



● माथेरान - हत्ती रोग संरक्षण जनजागृती आणि हत्ती रोगनिर्मूलन करणेसाठी ठाणे येथूनआठ जणाचे हत्ती रोग संरक्षण पथक माथेरान मध्ये दाखल झाले आहे. गेले दोन दिवस,दोन टीम विभागणी करून विविध भागात घरोघरी जाऊन रात्रीचे हत्ती रोगाची प्राथमिक टेस्ट रक्त तपासणी घेतली जात आहे. तसेच त्या भागाची भौगोलिक परिस्थिती काय आहे याचा अभ्यास केला जातं आहे हत्तीरोग जंतू (मायक्रोफायलरिया) मानवाच्या शरीरात असतात अशा व्यक्तीच्या रात्रीच्या वेळी त्वचेतील रक्तप्रवाह मुबलक प्रमाणात असतात म्हणुन या रोगाचे रात्री रक्त तपासणी केली जाते. हत्तीरोग संरक्षण पथक हे ठाणे रायगड आणि पालघर या तीन जिल्ह्यांमध्ये प्रमुख काम करते. ज्याप्रमाणे पोलिओ लसीकरणे निर्मूलन करण्यात आले .त्याचप्रमाणे हत्तीरोग समूळतः हटविण्यासाठी हे हत्तीरोग पथक रात्रि ठिकठिकाणी जाऊन नागरिकांचे रक्त तपासणी करून जनजागृती करत आहेत. शासनाच्या सार्वजनिक विभागामार्फत हत्तीरोग निर्मूलनाची ही मोहीम सर्वत्र राबविण्यात येत आहे त्या रक्त तपासणी मध्ये एखादा रुग्ण आढळल्यास त्याला ताबडतोब रुग्णालयात उपचार करून पुढील हत्तीरोगाचा धोका टाळता येणार आहे. हत्तीरोग म्हणजे पाय एकदम मोठा होणे हत्तीरोग झाल्यास पाय मोठा झाल्यावर त्यावर उपचार होणे अवघड आहे म्हणून शासनाच्या हत्तीरोग निर्मूलनाला सर्व नागरिकांनी सहकार्य करावे अशी विनंती करण्यात येते.

## रेल्वे हद्दीतील कल्व्हर्टच्या सफाईसाठी पालिका 'इन ॲक्शन'

### ३१ मेपूर्वी कामे पूर्ण करण्यासाठी कंबर कसली

● मुंबई : पावसाळ्यात तुडुंब भरून वाहणारे नाले, त्यातील कचऱ्यामुळे शहराबरोबरच रेल्वे वाहतुकीवरही विपरित परिणाम होतो. त्यामुळे नालेसफाईच्या कामांसोबत रेल्वे हद्दीतील कल्व्हर्ट (मोरी) ३१ मेपूर्वी स्वच्छ होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक रेल्वे स्थानकामागे एका पालिका अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. रेल्वेकडून हे कल्व्हर्ट स्वच्छ करून घेण्याची जबाबदारी या अधिकाऱ्यांची असणार आहे. मात्र, पावसाळ्याआधी रेल्वे हद्दीतील कल्व्हर्ट स्वच्छ झाल्याचे या अधिकाऱ्यांना प्रमाणित करून देणे गरजेचे असणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली. पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून पालिकेकडून नालेसफाई केली जाते. मात्र, रेल्वे हद्दीतील कल्व्हर्ट अनेकदा



सफाईविना राहिल्याने त्यात पावसाळ्यात पाणी तुंबते. रेल्वे आणि पालिकेत यावरून तू-तू-मैं-मैं ही होते. त्यामुळे पालिका आयुक्तांनी रेल्वे रूळांखालील व इतर ठिकाणीही बंदिस्त प्रवाह मार्गाची (कल्व्हर्ट) स्वच्छता करणे, ही कामे देखील समाविष्ट असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे यंदा कल्व्हर्टसाठी पालिकेने कंबर कसली असून, यासाठी सक्षम नियोजन केले आहे.

अनेक भागांत पालिकेने पुढाकार घेऊनही रेल्वे प्रशासनाकडून सफाई करण्यास विरोध होत आहे. त्यामुळे या विषयावर वरिष्ठ पातळीवर चर्चा करण्याची तयारी बांगर यांनी दाखवली. स्वच्छतेमुळे पावसाळ्यात किमान रेल्वे वाहतूक सुरळीत राहील, यासाठी प्रयत्न आहेत.

१) रेल्वेप्रमाणेच विविध प्राधिकरणांच्या प्रकल्पांमुळे नालेसफाईच्या कामात अडथळा येतो. त्यामुळे सफाईसाठी विभागस्तरावर पालिकेकडून त्यांच्याशी समन्वय साधला जात असल्याची माहिती बांगर यांनी दिली.

२) मेट्रो आणि रेल्वे या प्राधिकरणांशी योग्य समन्वय साधल्यास नालेसफाई चांगली होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## PM Modi says he would have 'taken' Kartarpur Gurudwara in 1971. Could India have?

Addressing an election rally in Patiala in Punjab Thursday, Prime Minister Narendra Modi said that had he been around, he would have ensured that the Kartarpur Sahib Gurdwara in Pakistan was "taken" by India before releasing the 90,000 Pakistani Prisoners of War after the 1971 battle between the two countries.

What could the PM be talking about?

During the 1971 Indo-Pak War, a pitched battle took place between Indian and Pakistani armies in the Dera Baba Nanak sector in Punjab, just a short distance from the Kartarpur Sahib Gurdwara in Pakistan. The gurdwara, associated with Guru Nanak Dev, is located barely 2.46 km from the international border.

However, the action in the Dera Baba Nanak sector was restricted to capturing a Pakistani enclave near the gurdwara and denying



the Pakistani Army access to a rail-cum-road bridge over the Ravi River which would provide them direct access to Dera Baba Nanak town in the Indian sector, with further road and rail connectivity to the rest of Punjab.

How did the battle in the Dera Baba Nanak sector proceed?

The Army's Jalandhar-headquartered 11 Corps was responsible for the defence of the area, right from Dera Baba Nanak enclave in the North to south of Anupgarh in Rajasthan. The Amritsar-headquartered 15 Division was responsible for the defence of Dera Baba Nanak enclave, and 86 Infantry Brigade was deployed in the area.

The task given to 86 Infantry Brigade was to contain any Pakistani threat from Kassowal enclave, a portion of Indian territory across the Ravi River which could provide a ready launchpad to the Pakistan Army to attack Indian defences in the area. In addition, the brigade was to hit Pakistani defences in the Jassar enclave, so as to protect the rail-cum-road bridge and defeat any potential Pakistani threat.

Festive offer

Was capture of the Kartarpur Sahib Gurdwara part of the plans?

There is no literature on the battle available which suggests that capture of the historic gurdwara was a military objective for the Dera Baba Nanak Brigade, which was focused on the two strategically important enclaves north and south of the Ravi, belonging to India and Pakistan respectively.

The Indian Army was able to overwhelm the Pakistanis in the Jassar enclave, which was defended by troops of the paramilitary force Pakistan Rangers. Their commander was not present at the company headquarters when Indian troops launched their attack on the intervening night of December 5-6, 1971.

Brig Gauri Shanker, the Commander of 86 Infantry Brigade, who was responsible for operations in the area, was ordered to eliminate the Pakistani Jassar/Dera Baba Nanak enclave by the morning of December 6.

## 57-year-old tailor arrested for impregnating teenaged client in Mumbai

The Mumbai police have arrested a 57-year-old tailor from the eastern suburbs of the city for allegedly repeatedly raping and impregnating a 15-year-old girl, police said on Friday.

The tailor also threatened the victim and warned her against revealing the abuse to her family members. The matter only came to light when her family realised that the girl was pregnant.

In Case You Missed | Return, surrender or face my anger: Former PM H D Deve Gowda warns Prajwal Revanna

A police officer said that the minor had gone to the accused to get her clothes stitched in November last year. Subsequently, the accused would call the victim to his shop several times under the pretext of recording her measurements, and each time he would force himself on her. He also threatened to kill her family members if she brought the issue to anybody's attention.

## Two Pune Police officers suspended for mishandling Porsche crash case in the beginning

Pune : Pune Police has suspended two of its officers attached to Yerwada Police Station for dereliction of duty in the initial response to the Porsche crash case that killed two IT engineers on May 19.

"A police inspector and an assistant police inspector have been suspended pending inquiry for dereliction of duty," a senior police officer of Pune Police said confirming the suspension.

Police Inspector Rahul Jagdale and Assistant Police Inspector



Vishwanath Todkari mishandled the investigation and failed to inform the wireless control room about the incident in time, the officer added.

Speaking to mediapersons ealrier today, Pune Police Commissioner Amitesh Kumar had hinted at the punitive action against officials involved in the early stage of the Porsche crash case. He had said that the internal inquiry conducted by an Assistant Commissioner of Police has prima facie found that there was 'some negligence' on part of the police officers involved in the first response to the case.

"There was some negligence by the officers concerned and appropriate action against that officer will be taken at the soonest," Kumar had told reporters eaerlier today when asked about the status of the internal inquiry being conducted by Pune City Police.

## थोडक्यात



### एसआरएची इमारत झाली ट्रांझिट कॅम्प; वरळीतील धक्कादायक प्रकार समोर

● मुंबई , प्रतिनिधी :

मुंबईतील वरळी डेअरीजवळ असलेल्या सुभेदार रामजी आंबेडकरनगर को-ऑप. हाऊसिंग सोसायटीची ट्रांझिट कॅम्प केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याला 80 वर्षीय जिजाबा शिंदे यांनी याविरोधात उच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. ही इमारत पाडू नये, अशी मागणी त्यांनी केली आहे. जिजाबा शिंदे यांनी वकील विज्ञान डावरे यांच्यामार्फत ही याचिका दाखल केली. न्यायधीश नितीन बोरकर आणि न्यायाधीश सोमशेखर सुंदरसेन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली.

जिजाबा शिंदे यांना 2006 मध्ये सुभेदार रामजी आंबेडकरनगर को-ऑप. हाऊसिंग सोसायटीतील घराचा ताबा मिळाला होता. गेली 18 वर्षे ते तिकडे वास्तव्यास आहेत. असे असतानाही कोणतीही पूर्वकल्पना न देता ही इमारत अचानक ट्रांझिट कॅम्प जाहीर करण्यात आली. त्यांना आता घर खाली करण्याची नोटीस देण्यात आली आहे. ही नोटीस रद्द करावी, अशी मागणी त्यांचे वकील विज्ञान डावरे यांनी केली. यावर, 'सर्व प्रक्रिया करूनच ही इमारत ट्रांझिट कॅम्प जाहीर करण्यात आली आहे,' आल्याचा दावा एसआरएचे वकील विजय पाटील यांनी केला.

तसेच, या सोसायटीमधील घरे रिकामी करण्यास 560 रहिवाशांनी तयारी दर्शवली असल्याची माहितीदेखील वकील विजय पाटील यांनी न्यायालयाला दिली. तसेच, ही प्रक्रिया राज्य शासनाच्या अध्यादेशानुसार झालेली नसल्याचे सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी न्यायालयाला सांगितले. या याचिकेत योग्य ते आदेश दिले जातील, असे नमूद करत खंडपीठाने ही सुनावणी तहकूब केली. दरम्यान, ही इमारत खान अब्दुल गफार खान मार्गावर असून झोपडपट्टीधारकरांनी एकत्र येऊन आंबेडकर नगर सोसायटी स्थापन केली. 2006 मध्ये जिजाबा शिंदे यांना घराचा ताबा मिळाला. विकासकाने एसआरएला खोटी माहिती दिली. या इमारतीला 2004 मध्ये सीसी मिळाला होता. या इमारतीला 2023 मध्ये सीसी मिळाली. या इमारतीतील घरे ट्रांझिट म्हणून येथील रहिवाशांना दिली होती. रहिवाशांनाच मोठे घर हवे आहे, असा बनाव मेसर्स सत्ताधर कन्स्ट्रक्शन प्रा.

# रायगडातील हापूसचा सातासमुद्रापार डंका

## आखाती देश, युरोप, अमेरिकेत हापूस आंब्याला मोठी मागणी

● पाली, प्रतिनिधी :

रायगडसह कोकणच्या हापूस आंब्याच्या चवीचा मोह जगाला पडतो. कोकणचा हापूस आंबा त्याच्या उत्तम चवीसाठी व अप्रतिम गोडीसाठी प्रसिद्ध आहे. जगप्रसिद्ध असलेल्या कोकणच्या आंबा बागायतदार शेतकऱ्यांपुढे सद्यस्थितीत अनेक संकट उभी ठाकली आहेत. कोकणातील शेतकरी बॉण्ड फायटर असल्याने तो हवामानबदल,अस्मानी, नैसर्गिक संकटात देखील पुन्हा जिद्दीने उभा राहतो. हा शेतकरी आत्महत्या करीत नाही. कोव्हिडं जगावर आलेली आपत्ती होती, मात्र या आपत्तीत आम्ही संधी शोधली, नैसर्गिक आपत्तीत ही आम्ही थांबलो नाही, राज्याच्या कानाकोपऱ्यात आम्ही आंबा थेट ग्राहकांपर्यंत पोहचवला. यामध्ये तत्कालीन जिल्हा कृषी अधिकारी यांची परवानग्या मिळवून द्यायला मदत झाली. अशावेळी सरकारकडून आंबा बागायतदाराला आवश्यक ती मदत ही मिळत नाही. ही शोकांतिका आहे. निसर्ग चक्रीवादळ, तोक्ते वादळात



आमची झाडे मोडून पडली मोठे नुकसान झाले. यातूनही आम्ही नवे विश्व, संधी आणि क्षितिज शोधले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना हेक्टरी 50 हजार, प्रमाणे 2 हेक्टर मागे 1 लाख रुपये मदत वाढवून आम्हा बागायतदार यांना मोठा दिलासा दिला. असे जांभूळपाडा अलिबाग येथील आंबा बागायतदार संदेश पाटील म्हणाले. सध्या परकीय आंब्याचे हापुसच्या नावाखाली होत असलेले अतिक्रमण चिंतेची बाब असून याकारणाने शेतकऱ्यांवर अन्याय होतोय, ग्राहकांची फसवणूक होतेय, आणी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हापुसचे नाव बदनाम होत आहे. हे थांबलं पाहिजे. कोकणच्या हापुसचे वैशिष्ट्य आणी गुणधर्म हापुसचा रंग, सुगंध आणी चव

■ खराब हवामानाचा, उष्णतेचा आंबा उत्पादनाला फटका बसला असून कोकणातील आंबा बागायतदार संकटात असल्याचे दिसत आहे. कोकणातील पाच जिल्ह्यात जो आंबा पिकतो, तोच हापूस आंबा आहे. इतर ठिकाणचा आंबा हापूस नाही. इतर राज्यातील आंबा हापूस सदृश आंबा असतो. त्या आंब्याला हापुसचा स्वाद नसतो. आज अलिबाग पासून पनवेल पर्यंत रस्त्यावर विक्रीसाठी आंबा विक्रीस आला आहे. मात्र यात हापूसच्या नावाखाली ग्राहकांची फसवणूक होते. हापूस आंब्याचा रंग, स्वाद आणि सुगंध यावरून ओळखता येतो. ग्राहकांनी आंबा विकत घेताना कोकणातील आंबा बागायतदार, शेतकरी यांच्याशी संपर्क साधून आंबा खरेदी करावा तसेच आम्ही जो जीआय टॅग मिळवले आहे ते पाहून आंबे घ्यावेत. आम्ही यावर्षी पासून पी आर कोड लावत असून ग्राहकांनी तपासून रिसर्च शोधून आंबे खरेदी करावेत असे आवाहन संदेश पाटील यांनी केले आहे.

यावरून ओळखता येतो. कोकणचा हापूस आंबा जागतीक बाजारपेठेत पोहचला याचा आनंद आणी समाधान असल्याचे आंबा बागायतदार संदेश पाटील म्हणाले. संदेश पाटील पुढे म्हणाले की कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे या ठिकाणी हापूस चे उत्पादन होते. यावर्षीचा विचार केला तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हापूसचे उत्पादन अधिक आहे, तर अन्य जिल्ह्यात आंबा उत्पादनात घट झाली आहे. रायगडमध्ये 30 टक्के पेक्षा उत्पादन कमी आहेत. सध्या कीटक आणि रोगाचा प्रादुर्भाव अधिक परिणामकारक ठरत आहे. अनेक वर्षे करीत असलेल्या फवारण्या , रोग प्रतिबंधात्मक उपाय करतो, मात्र आता किटकात प्रतिकारशक्ती निर्माण झाल्याचे दिसते. फुलकीड ही छोटीशी कीड असून ती प्रचंड नुकसान करते. फवारणीचा सर्वाधिक खर्च फुल किडूयांवर नियंत्रण आणण्यासाठी होतो. यावर्षी कोकणातील पाचही जिल्ह्यात फुलकिडूयाने आंबा बागायती व्यापल्या आहेत. प्रशासनाला, कृषी विभागाला सूचना देऊन ही कोणतीही कृती दिसत नाही.

## ४ दिवसांत ४ लाख भाविकांनी घेतले रामललाचे दर्शन




● अयोध्या , प्रतिनिधी :

जानेवारी २०२४ पासून अयोध्येतील भव्य राम मंदिर सर्वासाठी खुले करण्यात आले. राम मंदिरात रामललाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तेव्हापासून अयोध्येत भाविकांचा महासागर लोटला आहे. कोट्यवधी भाविकांनी रामदर्शन घेतले आहे. तसेच अयोध्येतील राम मंदिराला सढळ हस्ते दान दिले जात आहे. गेल्या चार दिवसांत सुमारे चार लाख भाविकांनी रामललाचे दर्शन घेतल्याची माहिती देण्यात आली आहे.


यंदाची राम नवमी अतिशय विशेष आणि वेगळी ठरली. राम मंदिराचे लोकार्पण झाल्यानंतर प्रथमच येणारी रामनवमी अयोध्येत मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली. रामनवमीच्या दिवशी भाविकांना रामदर्शन सुलभ व्हावे, यासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. रामनवमीनंतर राम मंदिरात येणाऱ्या भाविकांच्या संख्येत मोठी घट पाहायला मिळाली. परंतु, पुन्हा एकदा भाविकांनी रामललाचे दर्शन घेण्यासाठी राम मंदिरात गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या चार दिवसांत सुमारे चार लाख भाविकांनी रामाचे दर्शन घेतल्याचे सांगितले जात आहे.

प्रत्येक महिन्यात राम मंदिरात दीड कोटींचे दान

रामनवमीनंतर अयोध्येत येणाऱ्या भाविकांची संख्या ५० ते ६० हजारांवर आली होती. आता पुन्हा एकदा पर्यटकांसह भाविकांची संख्या वाढू लागली आहे. गेल्या चार दिवसांत चार लाखांहून अधिक भाविकांनी रामललाच्या दरबारात दर्शन आणि पूजा केली.

# 'मिठी'ला आयुक्तांची सरप्राईज व्हिजिट

## गाळ काढण्याच्या कामाचा आढावा



● मुंबई , प्रतिनिधी :

मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी गुरुवारी अचानक वाकोला नदी आणि मिठी नदीला भेट देऊन गाळ उपशाच्या कामाची पाहणी केली. दोन दिवसांपूर्वी आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार कामांना वेग देण्यात आला आहे का, याचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.

वांद्रे-कुर्ला संकुल येथे वाकोला नदीवरील पुलावरून वाकोला नदीतील गाळ काढण्याच्या कामाची पाहणी गगराणी यांनी केली. पन्टून संयंत्रावर स्थित पोकलेन लाँग ब्रूम संयंत्राद्वारे तेथे काम सुरू होते. वरच्या दिशेला असलेल्या भारतनगर वसाहतीच्या बाजूने येणारा तरंगता कचरा व गाळ सातत्याने काढला जात असल्याची माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी दिली.

# सहाव्या टप्प्यात दिल्लीसह 58 जागांवर निवडणूक, शनिवारी मतदान

● नवी दिल्ली , प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात, राजधानी दिल्लीतील सर्व सात जागांसह सहा राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील 58 जागांसाठीचा प्रचार गुरुवारी संपला. दिल्लीव्यतिरिक्त उत्तर प्रदेशातील 14, हरियाणातील 10, बिहार आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी आठ, ओडिशातील सहा, झारखंडमधील चार आणि जम्मू-काश्मीरमधील एका जागेवर मतदान होणार आहे. आतापर्यंत 25 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश आणि 543 पैकी



428 जागांवर मतदान पूर्ण झाले आहे. अंतिम टप्प्यात 1 जून रोजी मतदान होणार असून 4 जून रोजी मतमोजणी होणार आहे.

सहाव्या टप्प्यातील प्रमुख उमेदवार संबलपूर (ओडिशा) येथून धर्मेंद्र प्रधान (भाजपा), ईशान्य दिल्लीतून मनोज तिवारी (भाजपा) आणि कन्हैया कुमार (काँग्रेस), सुलतानपूर (उत्तर प्रदेश) येथून मनेका गांधी (भाजपा), अनंतनाग-राजौरी (जम्मू आणि काश्मीर) येथून मेहबूबा मुफ्ती (पीडीपी), तमलूक (पश्चिम बंगाल) येथे अभिजित गंगोपाध्याय (भाजपा), कर्नालला मनोहर लाल खट्टर, कुरुक्षेत्रमध्ये नवीन जिंदाल आणि गुरुग्राममधून राव इंद्रजीत सिंग निवडणूक रिंगणात आहेत. हरियाणातील रोहतक येथून काँग्रेसचे दीपेंद्रसिंग हुड्डा तर, सिरसा येथून काँग्रेसच्या कुमारी शैलजा निवडणूक लढवत आहेत. माजी परराष्ट्रमंत्री दिवंगत सुषमा स्वराज यांची लेक बांसुरी स्वराज यांना नवी दिल्लीतून निवडणूक लढवत आहेत.

# मोदी काळात देशातील देवत्वच संपून गेले, ठाकरे गटाचा हल्लाबोल



● मुंबई , प्रतिनिधी :

आपल्याला परमत्म्यानेच पाठविले आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात. पण मोदी काळात देशातील देवत्वच संपून गेले. धर्म भ्रष्ट झाला, सत्य निस्तेज झाले. विश्वासघाताचा बोलबाला वाढला. घराघरांत भांडणे आणि कलह लावून मोदी नावाचे अवतारी पुरुष टाळ वाजवीत राहिले, असा हल्लाबोल ठाकरे गटाने केला आहे.

भाजपास वाटते, देशातील सर्व लोक हे मर्त्य मानव आहेत आणि मोदी हे अजरामर देव आहेत. भाजपाचे एक पुढारी संबित पात्रा यांनी तर असे सांगून टाकले की, 'पुरीचे भगवान जगन्नाथ हे मोदी यांचे भक्त आहेत.' म्हणजे मोदी हे देवांचे देव आहेत. आपण देवच आहोत. अवतारी पुरुष आहोत आणि आपल्या हातात सुदर्शन चक्र असल्याचे भास स्वतः मोदी यांना होत असतात, अशी बोचरी टीका ठाकरे गटाने केली आहे. मोदी म्हणतात की, मला परमात्म्यानेच पाठवले आहे. माझ्याकडे असलेली ऊर्जा बायोलॉजीकल शरीराने येऊ शकत नाही.

# भारताच्या किनारपट्टीवर रेमल चक्रीवादळ धडकणार, वाचा कोणत्या राज्याला बसणार फटका?

● नवी दिल्ली , प्रतिनिधी :

शनिवारी किंवा रविवारी (ता. 26 मे) पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर चक्रीवादळ धडकणार असल्याचा इशारा भारतीय हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. रेमल असे या चक्रीवादळाला नाव देण्यात आले असून रविवारी या चक्रीवादळामुळे ताशी 102 किमीच्या वेगाने वारे वाहू शकतात, असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.



तर, पश्चिम बंगाल, उत्तर ओडिशा, मिझोराम, त्रिपुरा आणि दक्षिण मणिपूरच्या किनारी जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशाराही हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, चक्रीवादळ शुक्रवारी सकाळपर्यंत मध्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतरित होईल. हे चक्रीवादळ शनिवारी सकाळी चक्रीवादळात रुपांतरित होऊन बांगलादेश आणि लगतच्या पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर रविवारी सायंकाळपर्यंत तीव्र चक्रीवादळाच्या रुपात पोहोचेल. रविवारी हे चक्रीवादळ ताशी 102 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

# मुंबईसह महाराष्ट्रातील 20 हजार रिअल इस्टेट एजंटची नोंदणी निलंबित




● मुंबई , प्रतिनिधी :

घर खरेदी आणि डेव्हलपर यांच्यातही महत्त्वाचा दुवा म्हणजे रिअल इस्टेट एजंट असतात. प्रकल्पच्या अनुषंगाने प्राथमिक माहिती ही एजंटकडून मिळते. या माहितीच्या आधारेच ग्राहक घर खरेदीचा निर्णय घेतात. म्हणून महारेराने एजंटना प्रशिक्षण घेऊन आणि परीक्षा देऊन प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक केले होते. पण महारेराच्या परीक्षेला न बसणाऱ्या रिअल इस्टेट एजंटांच्या अडचणी वाढल्या आहेत. नियमांचे पालन न करणाऱ्या 20,000 एजंटची नोंदणी रेराने एका वर्षासाठी निलंबित केले आहे. जानेवारी 2023 मध्ये महरेराने सर्व एजंटसाठी परीक्षा अनिवार्य केली होती. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर एजंटला त्याचे प्रमाणपत्र वेबसाइटवर अपलोड करायचे होते. अनेकदा मुदतवाढ देऊन अखेर 1 जानेवारी 2024 नंतर तो नियम सर्व एजंटसाठी बंधनकारक करण्यात आला. तरीही परीक्षा न दिलेले 20,000हुन अधिक एजंट कार्यरत असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आले. त्यानंतर या सर्वांचे परवाने रद्द करण्यात आले. ग्राहकांचे हित लक्षात घेऊन, महारेराने गृहनिर्माण प्रकल्पाची योग्य माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचावी यासाठी अनेक पावले उचलली आहेत."एजंट ग्राहकांशी थेट संपर्क साधतात. अशावेळी प्रकल्प आणि क्षेत्राशी संबंधित प्रत्येक माहितीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

# बांग्लादेशी खासदाराला हनीट्रॅपमध्ये अडकवणारी महिला अटकेत; मुंबई कनेक्शनही समोर

● कोलकाता , प्रतिनिधी :

बांग्लादेश खासदार अनवारूल अजीम अनार यांच्या हत्येबाबत नवनवीन खुलासे होत आहेत. खासदाराच्या हत्येत बालमित्राचा कट, ५ कोटी सुपारी आणि हनीट्रॅप अँगल समोर आला आहे. बांग्लादेशच्या पोलिसांनी एका महिलेला ताब्यात घेतले आहे. या महिलेच्या माध्यमातून खासदाराला हनीट्रॅपमध्ये अडकवल्याचा आरोप आहे.

या महिलेचं नाव शिलांती रहमान असं आहे जी बांग्लादेशची नागरिक आहे. सूत्रांनुसार, शिलांती या हत्याकांडाचा मास्टरमाइंड अकतारुजमा शाहीनची प्रेयसी आहे. ज्यावेळी खासदार अनवारूल यांची हत्या झाली. तेव्हा ती कोलकाताला होती. १५ मे रोजी ती हत्याकांडातील मुख्य संशयित अमानुल्लाह अमान याला भेटण्यासाठी ढाका येथे पोहचली होती. अकतारूजमानं खासदाराला





बांग्लादेशातून कोलकाता येथे बोलवण्यासाठी शिलांतीचा हनीट्रॅप म्हणून वापर केला होता.

पश्चिम बंगाल सीआयडीनं बांग्लादेशी खासदाराच्या हत्येत पहिली अटक केली आहे. जिहाद हवलदार नावाचा हा व्यक्ती आहे. जिहाद हा व्यवसायाने कसाई आहे. त्याला मास्टरमाइंड अकतारुजमाने मृतदेहाचे तुकडे करण्यासाठी खास करून मुंबईहून बोलावलं होते. जिहादला २ महिन्याआधी या कामासाठी हायर केले होते. तो मुंबईहून कोलकाताला गेला. ५ कोटी सुपारीतील काही हिस्सा जिहादचा होता. तो कोलकाता एअरपोर्टजवळील एका हॉटेलमध्ये थांबला होता. खासदाराच्या बालमित्रानेच त्याच्या हत्येची सुपारी ५ कोटींना दिली होती. हा मित्र अमेरिकेचा नागरिक आहे.

बांग्लादेशी खासदार अनवारूल यांचा बालमित्र अकतारुजमा शाहीननं व्यावसायिक भांडणातून खासदाराची हत्या करण्याचं प्लॅनिंग केले. शाहीन हा झेनईदहचा राहणारा होता. त्याच्याकडे अमेरिकेचे नागरिकत्व आहे. त्याचा भाऊ झेनईदहच्या कोटचांदपूर महापालिकेचा महापौर आहे. शाहीन ३० एप्रिलला अमान आणि एका महिलेसोबत कोलकाताला आला होता. कोलकाताच्या सांजिबा गार्डनजवळ एक डुप्लेक्स फ्लॅट भाड्याने घेतला होता. शाहीन त्याचे २ सहकारी सियाम आणि जिहाद यांच्यासोबत आधीच कोलकातामध्ये आला होता. त्या तिघांनी मिळून खासदाराची हत्या केली.

### कशी केली हत्या?

शाहीनला खासदार १२ मे रोजी कोलकाताला जाणार हे आधीच माहिती होते. खासदाराच्या हत्येसाठी धारदार शस्त्रांची खरेदी केली होती. खासदार अनवारूल हे कोलकाता येथे त्यांचा मित्र गोपाल विश्वासच्या घरी थांबले. त्यावेळी १३ मे रोजी हनीट्रॅपद्वारे खासदाराला गुन्हेगारांनी फ्लॅटवर बोलावले. अनवारूल संजिबा गार्डन जवळील फ्लॅटमध्ये गेले. तिथे प्लॅनिंगनुसार, खासदाराला पकडलं, त्यानंतर गळा दाबून हत्या केली. त्यानंतर मृतदेहाचे तुकडे बनवले आणि वेगवेगळया ठिकाणी फेकून देणार होते. कोलकाता पोलिसांनी सीसीटीव्हीच्या सहाय्याने या हत्याकांडाचा खुलासा केला.